७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. २५ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## जादूचे पाणी लोकशाहीवर भारी होऊ देऊ नका

पुणे (दै. संध्या) : भाजप आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार आज विधिमंडळातील कामचुकार अधिकाऱ्यांवर चांगलेच संतापले. त्यांनी या अधिकाऱ्यांना भोंदू अशोक खरातची उपमा दिली. मंत्रालयात अशोक खरातचे जादूचे पाणी देणारे काही अधिकारी आहेत. त्यांचे जादूचे पाणी लोकशाहीवर भारी होऊ देऊ नका. अन्यथा आत्म्याविना शरीर, इंजिनविना गाडी आणि पेट्रोलविना स्कुटर अशी आमची अवस्था होईल, असे ते म्हणाले. आज विधानसभेत आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी आपल्या समितीचा पहिला अहवाल सादर केला. यावेळी त्यांनी अधिकारी वर्गाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सुधीर मुनगंटीवार यांनी नेमका हाच धागा पकडत अधिकाऱ्यांना अक्षरशः धारेवर धरले. ते म्हणाले, विधानसभा अध्यक्षांच्या नेतृत्वात संसदीय कामकाज धारदार व्हावे, प्रभावी व्हावे यासाठी आम्ही सर्वजण सूचना देतो. अध्यक्षही निर्देश देतात. शेवटी तुम्ही - आम्ही आज आहोत, उद्या असणार नाही. पण शेवटी हा देश, ही विधानसभा व लोकशाही राहिली पाहिजे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### नवले पूल अपघातांवर कायमस्वरूपी तोडगा

मुंबई (दै. संध्या) : पुणे येथील नवले पुलावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी सुमारे 6 हजार कोटी रुपयांचा एलिव्हेटेड रोड प्रकल्प केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, असे राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज (दि.24) विधानसभेत सांगितले. सदस्य भीमराव तापकीर यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य शंकर जगताप यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, संबंधित राष्ट्रीय महामार्गाचा सुमारे पाच ते सहा किलोमीटरचा भाग तांत्रिकदृष्ट्या संवेदनशील आहे. रस्त्याचा उतार अत्यंत तीव्र नसला तरी ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या जड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे निरीक्षण आहे. या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून एलिव्हेटेड रोड उभारणे आवश्यक आहे.

#### फोटो असलेल्या नेत्यांचीही चौकशी?

मुंबई (दै. संध्या) : अनेक महिलांचं लैंगिक शोषण केल्या प्रकरणी सध्या अटकेत असलेला भोंदू ज्योतिषी अशोक खरात याच्या कुकृत्यांचा पाढा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधिमंडळात मांडला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अशोक खरातवर कठोर कारवाईचे संकेतही दिले. दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या निवेदनावेळी उद्धवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी अशोक खरातसोबत संबंध आणि फोटो असलेल्या अधिकारी, नेतेमंडळींचीही चौकशी होणार का असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी सूचक विधान केलं आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अध्यक्ष महोदय, या प्रकरणामध्ये ज्या ज्या व्यक्तीविरोधात पुरावा मिळेल, त्या प्रत्येकाची आम्ही चौकशी करू. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपण सगळे राजकारणात आहोत. त्यामुळे कुणाचाही फोटो कुणासोबतही येतो हे आपण पाहिलेलं आहे. नुसता फोटो कुणासोबतही आहे, म्हणून एखाद्याला आरोपी करता येणार नाही, पण आता आपण डिलिटेड डेटाही काढत आहोत. त्यामुळे डिलिटेड डेटामध्ये कुणाचा संपर्क होता का? कुणी व्यवहार केला आहे का, कुणी मेसेज केले आहेत का? या गोष्टीत जो कुणी असेल, त्याची चौकशी केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले.

#### महाविद्यालयात मुलींना मोफत शिक्षण

भंडारा (दै. संध्या) : राज्य सरकारने राज्यातील मुलींना उच्च आणि व्यावसायिक शिक्षण पूर्णतः मोफत मिळावे, यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, मात्र, तरीही काही महाविद्यालये नियमांचे उल्लंघन करून विद्यार्थिनींकडून शुल्काची मागणी करत असल्याचे समोर आले आहे. याची गंभीर दखल घेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अशा महाविद्यालयांना थेट मान्यताच रद्द करण्याचा कडक इशारा दिला आहे.

## पोलिसांचा कोर्टात खळबळजनक दावा; कोर्टाने खरातला ठोठावली ५ दिवसांची कोठडी

# अशोक खरातने तब्बल ५ नरबळी दिल्याचा संशय

नाशिक (दै. संध्या)



महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटक असलेल्या भोंदू अशोक खरातला न्यायालयाने 5 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीत पोलिसांनी खरातवर नरबळी दिल्याचा संशय व्यक्त केला आहे. यामुळे या प्रकरणातील गांभीर्य वाढले आहे. दरम्यान, कोर्ट परिसरात उपस्थित असलेल्या नागरिकांनी भोंदू खरातच्या गाडीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

अशोक भोंदू खरातला कोर्टाने 24 मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. ही कोठडी आज संपली. त्यामुळे पोलिसांनी आज त्याला पुन्हा नाशिक सत्र न्यायालयात हजर केले. त्यात त्यांनी पुन्हा त्याच्या 7 दिवसांच्या कोठडीची मागणी केली. पण बचाव पक्षाने त्याला विरोध केला. अखेर कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने त्याला 5 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. त्यामुळे अशोक खरात 29 मार्चपर्यंत पोलिस कोठडीतच राहणार आहे. तत्पूर्वी, झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाने भोंदू खरातवर एक-दोन नव्हे तर तब्बल 5 नरबळी दिल्याचा संशय व्यक्त केला.

यासंबंधीच्या माहिती नुसार, एसआयटी अर्थात विशेष तपास पथकाचे अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यानी न्यायालयात प्रकरणाच्या तपासाची सद्यस्थिती सांगताना अशोक खरात विषयी अनेक धक्कादायक गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले, आरोपी अशोक खरात महिलांना खडे, पेढे देत होता. त्यांना पाण्यात काही पदार्थ मिसळून ते पिण्यास देत होता. यामुळे महिलांना अस्वस्थ वाटत असे. त्यानंतर तो त्यांचे लैंगिक शोषण करत असे. पोलिसांनी आरोपीच्या फार्म हाऊसमधून पिस्तूल, काडतुसे, रोडक व काही इलेक्ट्रॉनिक साहित्यही जप्त केले आहे. आरोपीकडे असणाऱ्या एकूण काडतुसांपैकी काही काडतुसे गहाळ आहेत. त्यामुळे त्यांचा कुठे काही वापर झाला का? याचा तपास केला जात आहे. आरोपीने काही विधींमध्ये नरबळी दिल्याचा संशयही आम्हाला आहे.

### अशोक खरात कोर्टात मान खाली घालून उभा

अशोक खरात न्यायालयात युक्तिवाद सुरू असताना मान खाली घालून उभा होता. तो स्वतःचेच बोट पाहत होता. न्यायालयाने एसआयटी अधिकारी सूर्यवंशी, सरकारी वकील व आरोपीच्या वकिलाचा युक्तिवाद ऐकून घेतला. त्यानंतर कोठडी सुनावण्यापूर्वी खरातला 'तुम्हाला काही बोलायचे आहे का?', असा प्रश्न केला. त्यावर खरात मोजून 5 वाक्य बोलला. तो म्हणाला, मला साप, वाघ याविषयी काही माहिती नाही. मी हे पहिल्यांदाच ऐकतो आहे. मंदिरात कधीतरी जायचो. त्यावेळी 100 च्या आसपास लोक असायचे. शिवरात्री, श्रावणी सोमवारी आशा वेळी जात होतो. 5 दिवसांच्या कोठडीत जे प्रश्न विचारले त्याची सगळी उत्तरे दिली.

### न्यायालय परिसरात खरातच्या गाडीवर हल्ल्याचा प्रयत्न

दुसरीकडे, न्यायालयीन सुनावणीनंतर पोलिस अशोक खरातला कडेकोट बंदोबस्तात घेऊन जात होते. यावेळी न्यायालय परिसरात उभ्या असलेल्या जमावाने त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत खरातला तेथून घेऊन निघून गेले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. यावेळी न्यायालय परिसरात सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते. मला संधी मिळाली तर मी खरातच्या कानाखाली वाजवेल, असे देसाई यावेळी म्हणाल्या.

## संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांना धमकीचे फोन : धनंजय देशमुख यांचा दावा

बीड (दै. संध्या)



संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला थांबवण्यासाठी आपल्या कुटुंबीयांसह नातेवाईकांना वेगवेगळ्या क्रमांकावरून फोन येत असल्याचा दावा संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे बीडमध्ये एकच खळबळ माजली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाची आज बीड जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. आजच्या सुनावणीत आरोपींच्या वकिलांना लॅपटॉपमधील अतिरिक्त पुरावे पेन ड्राईव्हच्या माध्यमातून देण्यात आले. यावेळी आरोपीच्या वकिलांनी पंचनाम्याचे व्हिडिओ देण्याची मागणी केली. पण सदर व्हिडिओ ई-साक्ष या शासकीय ॲपवर अपलोड असल्यामुळे ते देण्यास विरोध दर्शवला. यावेळी आरोपी क्रमांक 3 ते 7 यांच्याकडून विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यासाठी एक अर्ज कोर्टात सादर करण्यात आला. पण तो कोर्टाने फेटाळला.

## इराण युद्ध सुरू राहिल्यास गंभीर परिणाम होतील : नरेंद्र मोदी

नवी दिल्ली (दै. संध्या)

- येणारा काळ देशाची सर्वात मोठी परीक्षा घेईल, टीम इंडियासारखे काम करावे लागेल



पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी राज्यसभेत पश्चिम आशियातील परिस्थितीवर २१ मिनिटे बोलले. ते म्हणाले की, अमेरिका-इस्रायलचे इराणसोबतचे युद्ध सुरू राहिल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील. येणारा काळ देशाची सर्वात मोठी परीक्षा घेणारा आहे. यात राज्यांचे सहकार्य आवश्यक आहे. टीम इंडियाप्रमाणे काम करावे लागेल. ते म्हणाले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये आपली जहाजे आणि भारतीय क्रू अडकले आहेत. ही चिंतेची बाब आहे. आपले व्यापाराचे मार्ग प्रभावित होत आहेत. गॅस-तेल, खते यांसारख्या आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. एक दिवसापूर्वी पंतप्रधानांनी लोकसभेत २५ मिनिटांचे भाषण दिले होते. ते म्हणाले होते की, या युद्धामुळे जगात जी कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा प्रभाव दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला तयार राहावे लागेल. आपण कोरोनाच्या काळातही एकजुटीने अशा आव्हानांचा सामना केला आहे.

### पंतप्रधान मोदींच्या भाषणातील महत्त्वाच्या गोष्टी

- ऊर्जा संकटाने भारतालाही फटका बसला - पश्चिम आशियातील युद्धामुळे जगभरात ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. भारतात पेट्रोल, डिझेल, गॅस आणि खतांचा पुरवठा बाधित होत आहे.
- होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये जहाजे अडकली, भारतीयांनाही फटका - होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये अनेक जहाजे अडकली आहेत, ज्यात भारतीय खलाशीही आहेत. हे भारतासाठी चिंतेचे मोठे कारण आहे.
- भारत शांतता आणि संवादाची चर्चा करत आहे - भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की, तोडगा चर्चेतूनच निघेल. व्यावसायिक जहाजांवर हल्ला स्वीकारार्ह नाही.
- जगातील देशांशी भारत सतत संपर्कात - भारत पश्चिम आशिया, आखाती देश, अमेरिका आणि इस्रायल यांच्याशी सतत संपर्कात आहे.
- ऊर्जा पुरवठा कायम ठेवण्यासाठी सरकार सक्रिय - भारत आता 41 देशांकडून ऊर्जा आयात करत आहे. सरकार पुरवठा सातत्याने कायम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.
- भारताने आयातीचे स्रोत वाढवले - पूर्वी भारत 27 देशांकडून ऊर्जा घेत होता, आता 41 देशांकडून घेत आहे. यामुळे पुरवठ्यात लवचिकता आली आहे.

## भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा?

- शिंदे, चाकणकर, केसरकरांनी घेतली काळजी
- शासन, प्रशासन रसातळाला -विजय कुंभार

मुंबई (दै. संध्या)



अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय? अशी परिस्थिती असल्याची मिश्किल टिप्पणी माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रुपाली चाकणकर, दीपक केसरकर आदी नेत्यांनी पदावर असताना अशोक खरातची विशेष काळजी घेतली. त्याचे गुण माहिती असूनही त्याचे उदात्तीकरण केले. त्यामुळे भोंदू खरात हा सरकार पुरस्कृत बाबाच वाटतो, असे ते म्हणालेत. भोंदू अशोक खरातला पोलिसांनी लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक केली आहे. त्याच्यावर अनेक महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. राज्यातील अनेक बडे नेते व प्रशासकीय अधिकारी त्याच्या संपर्कात होते. आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्यासोबतचा खरातचा एक व्हिडिओही व्हायरल झाला आहे. त्यातच अशोक खरातने एका महिला नेत्याला लोकसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायकपणे फिरवण्याची ग्वाही दिल्याचीही बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर विजय कुंभार यांनी या प्रकरणी उपरोक्त टिप्पणी केली आहे. विजय कुंभार एका पोस्टमध्ये म्हणाले, भोंदूबाबा अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय याची खात्री पटावी अशी परिस्थिती सध्या आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खरातने मंदिरासाठी रस्त्याची मागणी केली आणि ती पूर्ण देखील झाली.मंत्रिमंडळ उप समितीने पाणी दिले, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पदावर असताना आणि त्याचे "गुण" माहीत असूनही त्याचे उदात्तीकरण केलं, त्याची दुष्कृत्ये माहीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले,त्याच्याकडे जास्तीत जास्त लोक आकर्षित होतील याची काळजी घेतली.महसूल विभागाने जमीन विषयक कायद्याकडे दुर्लक्ष केले. शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी तर कहर केला, अशोक खरातला अस्ट्रॉनॉमीचं चांगलं ज्ञान असल्याने आपण त्याच्याकडे ज्योतिष बघण्यासाठी जात होतो असं त्यांचं म्हणणं आहे.ज्या शिक्षण मंत्र्याला अस्ट्रॉनॉमी आणि अस्ट्रॉलॉजी यांच्यातला फरक कळत नाही त्यांच्याकडून काय वेगळी अपेक्षा करणार?.

## अखेर निर्बंध : सोशल मीडियाच्या विळख्यातून मुलांची सुटका !

मुंबई (दै. संध्या)



सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, अल्पवयीन मुलांवर होणारे मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम आणि डिजिटल सुरक्षेचे वाढते आव्हान या पार्श्वभूमीवर आज विधानसभेत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सखोल चर्चा पार पडली. या संदर्भात मंत्री आशिष शेलार यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. आशिष शेलार यांनी म्हटले की, राजेश पवार जी आणि इतर सदस्यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेतून सोशल मीडिया वापरावर निर्बंध, एज व्हेरिफिकेशनची सक्ती, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई, स्क्रीन टाईम लिमिट पॉलिसी आणि विद्यार्थ्यांसाठी डिजिटल सेफ्टी शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा ठोसपणे उल्लेख करण्यात आला. आशिष शेलार म्हणाले, या विषयाची गुंतागुंत आणि व्यापकता लक्षात घेता, महाराष्ट्र राज्याने अत्यंत संतुलित आणि दूरदृष्टी ठेवून पावले उचलली आहेत. इतर राज्यांनी केलेल्या केवळ घोषणांपेक्षा पुढे जात, महाराष्ट्र हे या विषयावर ठोस पावले उचलणारे पहिले राज्य ठरत आहे. केंद्र सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालातही 18 वर्षांखालील मुलांवर सोशल मीडियाच्या अतिरेकी वापरामुळे त्यांच्या नावीन्यपूर्णता, उत्पादकता आणि देशाच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केला.

## उद्धव ठाकरे साहेब यांना खूप खूप शुभेच्छा : एकनाथ शिंदेंनी विधान परिषदेत दिला निरोप

### नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरींचेही केले कौतुक

मुंबई (दै. संध्या)



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेतील 9 सदस्य आज आपला कार्यकाळ संपल्यामुळे निवृत्त झाले. त्यांना निरोप देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंचा उल्लेख 'उद्धव ठाकरे साहेब' असा केला. यावेळी त्यांनी त्यांना निरोगी दुर्घायुष्य लाभण्याच्या व पुढील राजकीय वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. शिवसेनेतील फुटीनंतर शिंदेंनी प्रथमच ठाकरेंना अशा शुभेच्छा दिल्यात. त्यामुळे त्यांच्या शुभेच्छांची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे. एकनाथ शिंदे आपल्या भाषणात म्हणाले, विधानपरिषदेचे 9 सदस्य आज आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे निवृत्त होत आहेत. गेल्याच आठवड्यात राज्यसभेचे काही सदस्य निवृत्त झाले. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, राजकारणात पूर्णविराम कधीच नसतो. सदस्य राज्यसभेतून निवृत्त झाले तरी त्यांचे जनजीवन संसदेच्या कक्षेबाहेरही निरंतर सुरू असते. त्याच धर्तीवर आज विधानपरिषदेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे कार्य यापुढेही निरंतर पुढे सुरू राहील याची मला खात्री आहे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी काही सदस्य पुन्हा या सभागृहात येतील. त्यासाठी मी शुभेच्छा देतो. एकनाथ शिंदे म्हणाले, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा या सदनाचे सदस्य उद्धव ठाकरे साहेब हे आज विधान परिषदेचा निरोप घेत आहेत. त्यांना निरोगी दुर्घायुष्य लाभो अशा मनापासून शुभेच्छा देतो. तसेच त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी देखील खूप खूप शुभेच्छा देतो. एकनाथ शिंदे यांनी यावेळी उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा उल्लेख शिवसेनेच्या फायर ब्रँड नेत्या असा केला. ते म्हणाले, आमच्या शिवसेनेच्या फायर ब्रँड नेत्या नीलम गोऱ्हे आज निवृत्त होत आहेत. त्या मागील 24 वर्षांपासून या सभागृहात आहेत. रा.सू. गवई साहेब सलग 30 वर्षे या सभागृहाचे सदस्य होते. त्यानंतर वि. स. पागे यांच्याकडे या सभागृहाचा 24 वर्षे सदस्य राहण्याचा मान आहे. त्यांच्या विक्रमाची बरोबरी नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. एक महिला म्हणून उपसभापती पदावर राहण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. उपसभापती म्हणून अत्यंत कणखरपणे, शिस्तबद्ध काम करून या वरिष्ठ सभागृहाचा सन्मान वाढवला. त्याचे पावित्र्य व लौकिक वाढवला. नीलम गोऱ्हे यांचा तोल कधी ढळत नाही. त्या कधी विचलित होत नाही. त्यांच्या चेहऱ्यावरची शांतता कधी ढळत नाही. त्यांचे काम बोलते. त्यांचे लिखाणही चांगले आहे. त्यांची वैचारिक बैठक पक्की आहे. त्यांची भूमिका कायम स्पष्ट असते. चांगल्याला चांगले व वाईटाला वाईट म्हणण्यास त्या घाबरत नाहीत. कालच ताईंनी घेतलेल्या एका निर्णयामुळे त्याची पुन्हा प्रचिती आली, असे ते म्हणाले.

## संपादकीय

# आम्हाला इंग्रजी कळत नव्हतं, पोरांना मराठी येत नाही!-हिशेब तिथेच!

एका आडवळणी गावाला जायचं म्हणून मोटारसायकल हाकत होतो. एकेरी सडक. मधूनमधून लागणारी बारकी गावं. एकेठिकाणी सडकेलगत 'न्यू ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल' अशी भरदार अक्षरं असलेली पाटी दिसली. शंभरेक पावलांवर, चहूबाजूंनी पत्रे मारलेले आणि छतही पत्र्याचंच अशा चार-सहा वर्गखोल्यांची शाळा. समोर वीतभर अंगण. त्यात रोवलेली ध्वजविरहित उंच काठी. आसमंतात सगळीकडे पसरलेली रुक्षकोरडी उन्हेरी मराठवाडी छटा... न्यू ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल! नाव वाचून आश्चर्य वाटलं नाही. मागच्या दीड-दोन दशकांपासून असल्या शाळा गावागावात दिसायला लागल्या आहेत.या शाळा बघताना मला गावातली आमची शाळा आठवते. उतरतं छत असलेली मोठी आयताकृती शाळा. दोन-तीन खोल्या ऑफिस, स्टाफरूम वगैरेत गुंतलेल्या आणि बाकीच्यांतून भरणारे वर्ग. चौकोनाच्या मधल्या मोठ्या रिकाम्या जागेत काही झाडं. एक फार प्राचीन चाफ्याचं, एक तुतीचं. त्याला आमच्या गावात सैतुलाचं झाड म्हणत. एक-दोन झाडं तर डाळिंबाची. पावसाळ्यात या झाडांच्या बुंध्याखाली चहाच्या रंगाचं पाणी दिसे आणि एरवी कोणत्याही दिवसात त्या हिरव्या पानांत पाखरं चिवचिवत असत. धोतर-सदरा-टोपी अशा पेहरावातले, खेडवळ दिसले तरी चांगलंच शिकवणारे आमचे गुरुजीलोक. इंग्रजी आणि गणित हे विषय पोरांना अवघड जात, पण ते सर्व संबंधितांनी गृहीतच धरलेलं. दहावीच्या परीक्षेत बहुसंख्य पोरं या दोन विषयांत आपटी खात. गणितं निदान सूत्रं कळायला लागल्यावर जमायची. इंग्रजीबद्दल असं नव्हतं. ती भाषा गावात ना कुठे कानी पडायची, ना दिसायची, त्यामुळे तिच्याशी मैत्री अशक्य आणि शत्रूभाव जास्त असे. असंख्य पोरं दहावीच्या परीक्षेत इंग्रजीत नापास होऊन शाळेला रामराम ठोकायची आणि जमेल त्या कामधंद्याला लागायची. इंग्रजीची भयंकर धास्ती खाल्लेली हीच आमची पिढी आता मजबूत फिया भरून आपल्या पोरांना गावगन्ना उगवलेल्या या 'न्यू ऑक्सफर्ड' स्कूलांमध्ये पाठवते. 'इंग्रजी येत नसल्यामुळे आपलं काहीच नीट झालं नाही' असा खोल गंड मनात कायम बाळगून असलेल्या आम्हा बापांमुळे इंग्रजी शाळांच्या बाजारपेठांना कमालीची तेजी आलेली आहे. याचा सगळ्यात वाईट परिणाम म्हणजे मराठी शाळा क्रमश: बंद पडणं. त्यात सरकारी अनास्थेचा भाग मोठा आहेच, पण आपल्या बबड्याला खाडखाड इंग्रजी यायलाच पाह्यजे, या आकांक्षेने पछाडलेल्या लोकांचाही यात सिंहाचा वाटा आहे. लोकांची ही भूक ओळखलेल्या व्यापाऱ्यांनी आणि अनेक नेते-पुढाऱ्यांनी मग गावागावातून इंग्रजी स्कूलं उभी करून मजबूत पैसा छापायला सुरुवात केली. दोनेक दशकांचा काळ सरला आहे. युनिफॉर्म घातलेली, खिशाला शाळेच्या नावाचा इंग्रजी बिल्ला लावलेली आणि टायबंद असलेली कथितपणे स्मार्ट दिसणारी मुलं आता घरोघर दिसतात. एकदा बाहेरून कुठून तरी घराकडे आलो, तर गल्लीत बरीचशी माणसं स्तब्धपणे उभी असलेली दिसली. कुणाचंसं



निधन झालेलं होतं. शेजारचा एक इंग्रजी शाळेत जाणारा मुलगा दिसला, त्याला विचारलं, कोण गेलं? दोनपाच सेकंद विचार करत तो म्हणाला, 'ते तिकडं खडं दिसतंय नं, त्याचे चुलत वडील ऑफ झालेत.' 'चुलत वडील' हे नातं लक्षात यायला मला मिनिटभर वेळ लागला. चुलत्याला मराठीत नेमकं काय म्हणतात हे त्या इंग्रजी शाळेतल्या मुलाला माहीत नव्हतं. आम्हाला इंग्रजी कळत नव्हतं. आमच्या पोरांना मराठी कळत नाही. म्हणजे एकूणात हिशेब जिथल्या तिथेच आहे.

## गुरु वचन

### विश्वासघात म्हणजे आत्मघात

गुरू हरगोविंदसिंहजी यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी एक म्हणजे पाइंदे खाँ. गुरुंना त्याच्यावर स्वत::पेक्षा जास्त विश्वास होता. त्याचे कतृर्त्व, त्याचे शौर्य या साऱ्यांवर गुरुजींचा अत्यंत विश्वास होता. परंतु पाइंदे खाँने याचा वेगळा अर्थ काढला आणि तो शिष्यांमध्ये गुरुजींचीच बदनामी करू लागला.

शिष्यांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तो कोणाचेच ऐकत नव्हता. शिष्यांनी गुरुजींनाही त्याच्या या गोष्टी सांगितल्या होत्या. गुरुजी मात्र शांत असल्याने शिष्यांना याचेही आश्चर्य वाटत होते. त्यांना कळतच नव्हते, की गुरुजींना अचानक काय झाले, पाइंदे खाँ गुरुजींच्या इतक्या जवळचा आणि तोच त्यांची बदनामी करतोय?

शेवटी गुरुजींच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्यांनी घोषणा केली, की पाइंदे खाँला दरबारातून काढून टाकावे. यानंतर पाइंदे खाँने बंडखोरी केली आणि तो मोगलांना जाऊन मिळाला. त्याने गुरुजींना जाताना धमकीही दिली 'तुम्ही मोगलांपुढे टिकूच शकणार नाहीत' गुरुजी शांत होते त्यांनी त्याची हकालपट्टी केली.

यानंतर पाइंदे खाँ थेट शहाजानला जाऊन भेटला आणि त्याने हरगोविंदसिंहजी विरोधात त्याचे कान भरले. शहाजहानने मग काले खाँच्या नेतृत्वाखाली एक फौज गुरुंवर हल्ला करण्यासाठी पाठवली. जालंधरमध्ये मोगल आणि शीख सैन्याचे युद्ध झाले.

या युद्धात पाइंदे खाँ ने गुरुंवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गुरुंनी त्याचे वार चुकवत त्याला माफी मागायला सांगितली आणि असे केले तर, मी तुला माफ करेन असे आश्वासनही त्याला दिले. परंतु तो ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता, त्याला झालेल्या गर्वाने त्याच्या मेंदूवर ताबा मिळवला होता. त्याने पुन्हा गुरुजींवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या फारसा परिणाम झाला नाही.

गुरुजींनी त्याचा हाही वार चुकवला. त्याला पुन्हा शरण येण्याचे आवाहन केले. परंतु तो ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी गुरुजींना त्याचा वध करावाच लागला. इकडे मोगल सैन्याचेही बारा वाजले. त्यांचाही पराभव झाला. आणि काले खाँ आल्या पावली पळत सुटला.

## उपदेशकथा

### विचार

एक कोल्हा एका खोल तलावात पडला. त्यातून त्याला बाहेर निघता येईना. इतक्यात तिकडून एक तहानलेला बोकड आला. तलावात कोल्ह्याला पाहून त्याने विचारले, 'काय हो, आतलं पाणी चांगलं पिण्यासारखं आहे का?' ही आयतीच संधी पाहून कोल्ह्याने त्या पाण्याची खूप स्तुती केली. तहानलेल्या बोकडाने कसलाही विचार न करता आत उडी घेतली पोटभर पाणी प्यायल्यावर मात्र मग ते दोघे बाहेर कसं पडायचं याचा विचार करू लागले. कोल्हा एकदम म्हणाला, 'बघ एक चांगली कल्पना सुचलीय मला. तू मदत केलीस तर आपल्या दोघांचीही सुटका होईल. असं कर तू पुढचे पाय तलावाच्या भिंतीला लाव आणि शिंगे ताट करून उभा रहा. मी तुझ्या शिंगावरून उडी मारून वर जातो व तुलाही वर घेतो.

बोकडाने कोल्ह्याच्या सांगण्याप्रमाणे केले. कोल्हा शिंगावरून उडी मारून वर गेला आणि चालू लागला. बोकडाने तक्रार केल्याबरोबर थोडासा मागे वळून म्हणाला, मित्रा, तुझ्या या लांब दाढीपेक्षा तुझ्या डोक्यात थोडी अक्कल जास्त असती तर बरं झालं असतं. आत उडी मारण्यापूर्वी वर कसं यायचं याचा विचार केला होतास का?

कथा उपदेश : धोरणी माणसे अखेरपर्यंतचा सर्व विचार केल्याशिवाय कुठल्याही कामाला हात घालीत नाहीत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २७:०८:५८+ |
| २५ मार्च २०२६ | करण:वणिज १३:५०:२० |
| बुधवार | करण:विष्टि २४:४७:२८+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:मीन |
| चैत्रशके संवत्– १९४८ | चन्द्र:मिथुन०६:१७:०० |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – शव्वाल |
| मास– चैत्र | तारीख – ५ |
| ऋतु– हेमंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | आयंबील ओळी |
| तिथि:सप्तमी १३:५०:२० | प्रारंभ (जैन) |
| नक्षत्र:मृगशिर्षा | एकवीरादेवी पालखी |
| १७:३३:१३ | सोहळा – कार्ला |
| योग:सौभाग्य | |

## दै.'संध्या'धमाल सूडोकु क्र. ८९७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | | | | | | | |
| 2 | | 6 | | 5 | 8 | | | 1 |
| 5 | 8 | 9 | | | 1 | | 3 | |
| 6 | | 7 | | | 9 | | 2 | |
| | | | 4 | | 6 | | | |
| | 4 | | 1 | | | 6 | | 9 |
| | 5 | | 2 | | | 1 | 9 | 8 |
| 7 | | | 9 | 1 | | 3 | | 6 |
| | | | | | | | 7 | 2 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८९६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 9 | 5 | 4 | 1 | 7 | 3 | 8 |
| 4 | 8 | 3 | 6 | 7 | 9 | 5 | 2 | 1 |
| 1 | 5 | 7 | 2 | 3 | 8 | 9 | 4 | 6 |
| 6 | 2 | 1 | 9 | 5 | 7 | 3 | 8 | 4 |
| 7 | 9 | 4 | 8 | 2 | 3 | 6 | 1 | 5 |
| 5 | 3 | 8 | 4 | 1 | 6 | 2 | 7 | 9 |
| 3 | 7 | 5 | 1 | 6 | 4 | 8 | 9 | 2 |
| 9 | 4 | 6 | 7 | 8 | 2 | 1 | 5 | 3 |
| 8 | 1 | 2 | 3 | 9 | 5 | 4 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १३०६ – रॉबर्ट ब्रुस स्कॉटलँडचा राजा बनला.
- १९११ – न्यूयॉर्क सिटीमध्ये ट्रायंगल शर्टवेस्ट फॅक्टरीला आग लागली. या आगीत १४६ कामगारांचा मृत्यू झाला.
- १९४७ – अमेरिकेत सेंट्रालिया, इलीनोईस येथे कोळशा खाणीत स्फोट झाला. यात १११ जण ठार झाले.
- १९९० – ब्रुन्क्स, न्यूयॉर्क सिटीमध्ये अवैध सोसीशीयल क्लब 'हॅपी लँड' मध्ये आग लागून ८७ जण ठार झाले.
- २००८ – 'स्लेजिंग'मुळे गाजलेल्या भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने 'स्लेजिंग'वर बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

### राष्ट्रीय

- २००७ – भारताने हवेमधून हवेत मारा करणाऱ्या अस्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.

### जन्म

- १८०१ – वसीली तिसरा, मॉस्कोचा राजा.
- १७८२ – कॅरोलाईन बोनापार्ट, नपलेसची राणी.
- १९२१ – अलेकझेंडरा, युगोसलाव्हीयाची राणी.

### निधन

- १८०१ – नोवालीस, जर्मन कवी.
- २००६ – रोकीओ डर्कल, स्पेनीश गायिका आणि अभिनेत्री.
- २००६ – रिचर्ड फ्लेश्चर, अमेरिकी चित्रपट दिग्दर्शक.
- २००७ – अंद्रानीक मारगरीयन, अमेरिकेचे १४ वे पंतप्रधान.
- २००७ – चीनचे महान क्रांतीकारी नेते माओ त्से तुंग या माओ जेदांग यांचे शेवटचे सुपूत्र आंकिंग यांचे निधन.

## : SMS :

2 sardar soldiers captured a Pakistani soldier and gave him a dice and said, " If you get 1,2,3,4 or 5, we will kill you."
Paki:"What if I get 6?"
Sardar:"You'll have to play again."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.३ | १९.६ |
| अहमदनगर | ३२.५ | १९.२ |
| अकोला | ३४.८ | २०.७ |
| अमरावती | ३३.७ | २०.४ |
| बीड | ३५.५ | २०.९ |
| भंडारा | ३४.७ | १९.५ |
| बुलढाणा | २७.५ | १६.५ |
| चंद्रपूर | ३५.८ | २१.२ |
| चेन्नई | ३६ | २६.२ |
| नवी दिल्ली | २६.६ | १९.३ |
| धुळे | ३३.९ | १९.२ |
| गोंदिया | ३२.६ | १९.७ |
| जळगाव | ३४.५ | १७.९ |
| कोल्हापूर | ३३.५ | १९.२ |
| लातूर | ३३.६ | २१.२ |
| मुंबई | ३५.४ | २६.५ |
| नागपूर | ३३.५ | २१.७ |
| नांदेड | ३६.१ | २२.९ |
| नंदूरबार | ३२.४ | २२.३ |
| नाशिक | ३३ | १८ |
| पुणे | ३१.७ | २१.४ |
| पंढरपूर | ३५.७ | २१.७ |
| सातारा | ३३ | १७.८ |
| सांगली | ३४.२ | २१.१ |
| सोलापूर | ३६.१ | २१.४ |
| वर्धा | ३४.८ | २१.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम नोकरदारांनी हवी तेथे बदली करून घेण्यासाठी प्रयत्नशील रहा.

**तुळ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पश्चिम गाठीभेटीतून काही शिकायला मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व आर्थिक प्रकरणातून अजूनही यशस्वी वाटचाल राहील. नोकरीव्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला जाईल.

**वृश्चिक:** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम कौटुंबिक प्रश्नांना सहज मार्ग सापडतील. एकंदरीत अनेक क्षेत्रातील दडपण कमी होत राहील.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण आर्थिक वसुली आणि मोठे व्यवहार करताना क्षेत्रातील बुजुर्गांची मदत घेणे हितावह ठरेल.

**धनु :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम स्वत:ची तब्येत आणि पथ्यपाणी सांभाळून वेळापत्रक अचूकपणे साधण्याचा प्रयत्न करा.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पूर्व एखादी मोठी गुंतवणूक करताना पुरेशी सल्लामसलत झाल्याची खात्री करा. न पेलणारी आश्वासने देऊ नका.

**मकर :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व एखाद्या सामाजिक चळवळीचे नेतृत्व हाती येईल. भाव–भावनांचा व खाण्या–पिण्याचा कोणताही अतिरेक टाळा.


**सिंह :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व भावनांची कदर करा. फार मोठ्या महत्त्वाकांक्षा काही दिवस बाजूला ठेवणे हितकारक.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : दक्षिण नोकरीव्यवसायातील जबाबदारी स्वत:हून स्वीकारायची घाई करू नका. सल्लामसलत उपयोगी ठरेल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : दक्षिण वरिष्ठांच्या गाठीभेटीतून महत्त्वाचा निर्णय घेऊ शकाल. आपल्या विचारांना योग्य दिशा मिळेल.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व संघटनेद्वारे आपला एखादा प्रश्न सोडवून घेता येईल. युवकांनी वाढणारी कार्यशक्ती योग्य कारणी लावा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८९७



**आडवे शब्द**

१. अचूक उपाय (ला.)
४. दोघे
७. परीक्षा करण्यात नापास!
११. अपेक्षित वेळेनंतर
१२. धार लाव!
१३. अटीची भाषा
१४. मनात उठणारे वादळ
१५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री
१८. खोडसाळ, वात्रट
२०. पिकाचा गाळ
२२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच
२३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री
२४. अस्वल
२५. अल्प
२७. 'जैसे थे' परिस्थिती
२९. मरेपर्यंत
३१अ. दबाव
३२. लहान
३३. संगीतातील एक राग
३५. हार, सर
३६. वस्ती
३८. भांडणाची कळ
३९. कलावंत
४१. देशाचे नाणे
४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा
४३. मार्गक्रमण
४५. त्वरेने, तत्परतेने
४७. नूतन
४८. नाश पावणारे
५०. आवाजाची गोंधळ
५१. विशेष
५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी
५४. पुन्हा पुन्हा
५७. बाई
५८. मद्य
६०. जुगाराचा एक प्रकार
६१. थेट, सरळ
६३. शुष्कता, तीव्र ऊन
६४. शहाणा, सुंदर
६७. वडील
६९. राख
७२. व्याकूळ, घाबरलेला
७४. पेढ्याचा एक प्रकार
७५. कणीदार
७६. विखारी चेष्टा
७७. शिक्षा

**उभे शब्द**

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन
२. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर'
३. नेमका तपशील
४. छाती
५. देवाचे असेल तर ठीक!
६. लकेर
७. समुद्रातील लाटांचा आवाज
८. भरजरी
९. रममाण, निमग्न
१०. कबूतर
१२. एक पंजाबी नाव
१६. ऐन
१७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य
१९. सर्वस्व
२१. लेखक मतकरींचे नाव
२४अ. फळांचे पेय
२५. दोस्त
२६. शरीर
२८. पाताळ
२९. शिव्याशाप
३०. अंकित माणूस, गुप्तहेर
३१. शक्ती, जोर, बळ
३१अ. लाही–लाही
३३. हिमालयातील पांडावकालीन सरोवर
३४. वेडावाकडा
३५. खाणाखुणांवरून पाठलाग
३७. उंट हाकणारा
४०. पापडाच्या पिठाची गोळी
४१. हालचाल
४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
४५. पटापटा
४६. '––– काय अन् फाटक्यात पाय!'
४९. पाठविलेला
५०. ऋणको, कर्ज घेणारा
५१. फुकटचंबूंमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला
५२. सदोदित
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५६. वेतन
५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप
६०. महिरप
६२. पशूंचे ओरडणे
६५. विष, ६६. सजावट
६७. विहीर
६८. माहूताकडील शस्त्र
७०. मीठ, ७१. पलंग, बाज
७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य

**जम्बो शब्दकोडे क्र. ८९६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर : १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### ज्योतिषशास्त्र हे कालसापेक्ष तरी त्याची मूलतत्त्वे स्थिर : ज्येष्ठ पंचांगकर्ते मोहन दाते

■ गीता धर्म मंडळ आणि ग्रंथ पारायण दिंडी यांच्यावतीने 'नवीन वर्ष नवीन पंचांग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : ज्योतिषशास्त्र हे कालसापेक्ष असले तरी त्याची मूलतत्त्वे स्थिर आहेत. ग्रह तेच आहेत, परंतु त्यांच्या योगांनुसार काळ बदलत जातो. त्यामुळे ज्योतिषशास्त्र बदलत नाही, तर त्याचे आकलन काळानुसार पाहावे लागते. या सर्व गोष्टींचा विचार करताना नक्षत्रे आणि ग्रह यांना अत्यंत महत्त्व आहे. कालाच्या कसोटीवर त्यांचे निरीक्षण करूनच योग्य निष्कर्ष काढले जातात, असे मत ज्येष्ठ पंचागकर्ते मोहन दाते यांनी व्यक्त केले. गीता धर्म मंडळ आणि ग्रंथ पारायण दिंडी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोहन दाते यांचे 'नवीन वर्ष नवीन पंचांग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन सदाशिव पेठेतील गीता धर्म मंडळात करण्यात आले होते. यावेळी गीता धर्म मंडळाचे मुकुंद दातार, ग्रंथ पारायण दिंडीचे वीरेंद्र कुंटे उपस्थित होते. पंचांग क्षेत्रातील योगदानाबद्दल दाते यांचा विशेष गौरव यावेळी करण्यात आला. सण आणि उत्सव तसेच रुढी परंपरा याविषयावर सुध्दा मार्मिक विवेचन केले, मोहन दाते म्हणाले, घड्याळानुसार रात्री १२ वाजल्यानंतर वार बदलतो. हा इंग्रजी पद्धतीनुसार ठरवलेला वार आहे. परंतु पंचांगानुसार एक वार हा एका सूर्योदयापासून पुढील सूर्योदयापर्यंत मानला जातो. संपूर्ण पृथ्वीवर वेळेत फरक असला तरी खगोलीय घटना मात्र एकसमान असतात. ते पुढे म्हणाले, पूर्वी सर्व व्यवहार पंचांगानुसारच चालत होते. पुढे कॅलेंडर पद्धती प्रचलित झाली. ऋतूंशी सुसंगती ठेवण्यासाठी सौर वर्ष (३६५ दिवस) स्वीकारले गेले, तर पंचांगातील चांद्र वर्ष साधारणतः ३५४ दिवसांचे असते, असेही त्यांनी सांगितले.



### आईच्या मायेची तुलना जगात कशाशीही होऊ शकत नाही : अध्यक्ष राजा दीक्षित

पुणे (दैनिक संध्या) : प्रत्येक माणूस हा आपल्या आईसाठी कायमच लहान मूल असतो. त्यामुळे आजचा सन्मान हा मातृत्वाचा सन्मान असून, ती एक प्रकारची पूजाच आहे. मातेला माया शिकवावी लागत नाही; ती उपजतच असते. आईच्या मायेची तुलना जगात कशाशीही होऊ शकत नाही. जगाच्या उत्पत्तीपासूनच मानवजात मातृपूजक आहे. कृतज्ञता दुर्मिळ होत चाललेल्या या काळात मातृगौरव पुरस्कारासारखे कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतात, असे मत मराठी विश्वकोश मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केले. मातृगौरव न्यास, अखिल मंडई मंडळ आणि ज्ञानेश्वरी वाचन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ व्या मातृगौरव सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, दत्ता सागरे उपस्थित होते. कार्यक्रमात शुभांगी शेठ, मालती गिरे, शैलजा पेठकर, लीला रणधीर, जयश्री वडके, मालती दाते, शुभदा ठाकूर, मंदाकिनी वारे, संध्या झरकर, जयश्री टापरे, उज्वला लवाटे, कीर्ती यार्दी आणि सुचेता देशपांडे या मातांचा सन्मान करण्यात आला. दत्तक मूल घेणारी माता आणि कॅन्सर सारख्या दूर्धर आजाराचा सामना करणाऱ्या मातेचाही कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. पराग काळकर म्हणाले, मातृदिन आणि पितृदिन हे आजकाल फक्त मोबाईलच्या डीपीमध्ये दिसतात; प्रत्यक्ष वागण्यात मात्र त्यांचा अभाव जाणवतो. बाहेर जाऊन मुलांसाठी संस्कार शिबिरे आयोजित केली जातात, पण घरातील संस्कार मात्र वृद्धाश्रमात ठेवले जातात आणि विकतचे संस्कार घरी आणले जातात. फ्लॅट संस्कृती वाढत असताना लोकांची मने संकुचित होत चालली आहेत आणि जन्मदात्रीला घरात स्थान मिळेनासे झाले आहे. आपण कृतीतूनच जन्मदात्यांना विस्थापित करतो, हे आपली मुले पाहत असतात. मातृसत्ताक व्यवस्था आणि एकत्र कुटुंब पद्धतीमुळेच भारताची संस्कृती टिकून आहे,असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद सराफ यांनी केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले, तर गिरीश पोटफोडे यांनी आभार मानले.




### सोनी सब सादर करीत आहे वीरांची भव्य गाथा – 'हस्तिनापुरचे वीर'

पुणे (दैनिक संध्या) : भारतातील अग्रगण्य जीईसी चॅनेल्सपैकी एक, सोनी सब, आपला मेगा शो हस्तिनापुर के वीर घेऊन येत आहे. ही एक दमदार कथा आहे धैर्य, शिस्त आणि कालातीत मूल्यांची. या महाकथेतील प्रवास दाखवतो की कसा चिकाटी, बंधुभाव आणि एका मजबूत आईचे मार्गदर्शन अशा योद्ध्यांना घडवते, ज्यांनी इतिहासावर अमिट छाप सोडली. प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढवण्यासाठी सोनी सबने एक आकर्षक प्रोमो लॉन्च केला आहे, ज्यात या प्रवासाची झलक दाखवली आहे. या प्रोमोला आधीच प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. हस्तिनापुरच्या भव्य पार्श्वभूमीवर आधारित हा शो एकता, धर्म आणि चिकाटीची कहाणी जिवंत करतो. तो दाखवतो की दंतकथा जन्माला येत नाहीत, त्या घडवल्या जातात. दमदार कथाकथन आणि व्हिज्युअली इमर्सिव्ह जगासह हस्तिनापुर के वीर प्रेक्षकांना त्या काळात घेऊन जाईल, जिथे मूल्ये आणि नियती एकत्र येतात. लिंक येथे: https://www.instagram.com/p/DWMNDd_gqZN/ हस्तिनापुरचे वीर मध्ये जाणून घ्या दंतकथांचा जन्म, लवकरच सोनी सबवर.

# महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक

## प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून संसदेत मुद्दा उपस्थित; मानवी तस्करी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजनांची मागणी



पुणे (दै. संध्या) : राज्यात महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक असून, याबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी संसदेत मंगळवारी केली. 'झीरो अवर'मध्ये वाढत्या मानवी तस्करीबाबत मेधा कुलकर्णी यांनी प्रश्न उपस्थित करीत या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे नमूद केले. सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, जेणेकरून महिला व अल्पवयीन मुलींची सुरक्षितता सुनिश्चित होईल, असे त्यांनी म्हटले.

आपल्या निवेदनात प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "या समस्येचे स्वरूप अत्यंत चिंताजनक असून, गृह विभागाच्या आकडेवारीनुसार २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांत तब्बल ९३ हजार ९४० महिला व मुली बेपत्ता झाल्या आहेत. यापैकी २३ हजारांहून अधिक अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. दररोज सरासरी १३२ महिला बेपत्ता होत असल्याचे आढळले आहे. मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई यांसह पुण्यातही अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. पुण्यातच गेल्या १५ दिवसांत १३ ते १७ वयोगटातील २० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणांमध्ये मानवी तस्करीच्या संघटित जाळ्यांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. जबरदस्तीने पळवून नेणे, खोट्या प्रेमसंबंधांच्या माध्यमातून फसवणूक, तसेच सोशल मीडियाचा गैरवापर यांसारख्या बाबीही पुढे येत असल्याचे निरीक्षण गृहविभागाने नोंदवले आहे."

तपास आणि शोधकार्याचा वेग अत्यंत कमी असल्याचे सांगून प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, २०२४ मधील ४५ हजार प्रकरणांपैकी १५ हजार प्रकरणांमध्ये अद्याप कोणताही ठोस मागोवा लागलेला नाही. २०२५ मधील ४८ हजार प्रकरणांपैकी १३ हजार महिला अद्याप सापडलेल्या नाहीत. म्हणजेच, गेल्या दोन वर्षांत सुमारे २८ हजार महिला व मुलींचा अद्याप शोध लागलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बेपत्ता झालेल्या महिलांचे भवितव्य काय, त्यांची तस्करी झाली का, त्यांना परदेशात विकले गेले का, किंवा त्यांच्यावर अत्याचार झाला का, असे गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

या समस्येवर उपाय म्हणून काही ठोस मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये 'गोल्डन अवर्स'मध्ये त्वरित शोध घेण्यासाठी आधुनिक व जलद तपास यंत्रणा उभारणे, मोबाईल ट्रॅकिंग प्रणाली अधिक सक्षम करणे, सार्वजनिक ठिकाणी कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे व त्यांचे सतत निरीक्षण करणे यांचा समावेश आहे. तसेच, जबरदस्ती धर्मांतर आणि विवाहाच्या प्रकरणांवर कठोर कारवाई, अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण, तसेच प्रवास आणि हॉटेलमध्ये ओळखपत्र अनिवार्य करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातील टोल नाक्यांवर डिजिटल पेमेंट व ओळख प्रणाली अधिक सक्षम करण्याचीही आवश्यकता असल्याचे त्या म्हणाल्या.

## पुढील पिढीतील जागतिक ताऱ्यांच्या शोधासाठी ऑडिशन्सची घोषणा




पुणे (दै. संध्या) : हायब इंडियाने आज हायब इंडिया ऑडिशनची घोषणा केली. यामुळे हायबने भारताच्या टॅलेंट इकोसिस्टममध्ये अधिकृत प्रवेश केला असून जागतिक कलाकार शोध मोहिमेचा विस्तार करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.हायबच्या 'मल्टी-होम, मल्टी-जनर' या जागतिक यशस्वी धोरणाचा भाग म्हणून हायब इंडिया भारतासाठी स्थानिक पातळीवर कलाकार विकासाची पद्धत आणणार आहे. बीटीएस सारखे २१व्या शतकातील पॉप आयकॉन आणि जागतिक गर्ल ग्रुप कॅटसाई घडविण्याचा वारसा असलेल्या कंपनीने आता भारताकडे लक्ष केंद्रित केले आहे, जेणेकरून पुढच्या पिढीतील ग्लोबल स्टार्स शोधता येतील. हायब इंडिया ऑडिशनचा उद्देश भारतातील आणि भारतीय डायस्पोरामधील उदयोन्मुख संगीत प्रतिभा शोधणे आहे. निवडलेल्या उमेदवारांना हायबच्या वर्ल्ड-क्लास ट्रेनिंग आणि प्रॉडक्शन इकोसिस्टममध्ये प्रवेश मिळणार आहे. क्रिएटिव्ह डेव्हलपमेंट, परफॉर्मन्स ट्रेनिंग आणि ग्लोबल स्टोरीटेलिंग यांचा संगम घडवून हा कार्यक्रम अशा कलाकारांना घडवेल जे भारताचे प्रतिनिधित्व जागतिक मंचावर करू शकतील. या उपक्रमाच्या केंद्रस्थानी हायब इंडियाचा भारतीय तरुणांवरील विश्वास आहे.

## बहुजन नेते डॉ. हुलगेश चलवादी यांचा आरपीआय (आ) पक्षात प्रवेश

### मा. रामदास आठवलेंच्या दुरदृष्टी नेतृत्वात बहुजनांसाठी काम करण्याचा संकल्प



पुणे (दै. संध्या) : बहुजन, दलित तसेच वंचित-पीडित-उपेक्षितांचा बुलंद आवाज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.रामदास आठवले यांच्या दुरदृष्टी तसेच समाजभिमुख नेतृत्वाने प्रेरित होवून बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी आरपीआय (आ) पक्षात प्रवेश केला आहे. पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात मा.आठवले साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश करतांना डॉ.चलवादी यांनी साहेबांच्या नेतृत्वात बहुजन चळवळीसाठी काम करण्याचा निर्धार केला आहे. डॉ.चलवादी यांच्यासह बसपचे पुणे जिल्हा प्रभारी अनिल त्रिपाठी, चलवादी माळा विकास महासंघाचे अध्यक्ष भीम सिंह चलवादी, अॅड.प्रदीप चिंचोलीकर, निवृत्त आयपीएस अधिकारी अविनाश मस्के, निवृत्त प्रॉव्हिडंट फंड आयुक्त विकास जावळे, प्रकाश सोनवणे, सुधीर वाघमोडे, माजी नगरसेवक संतोष आरडे यांनी पक्षप्रवेश केला.

कार्यक्रमात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्रदेश महासचिव गौतम सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, आरपीआय (आ) पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक निलेश आल्हाट, इतर माजी नगर सेवक व पुणे व प्रदेश कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. मा.आठवले साहेबांच्या नेतृत्वात बहुजन चळवळीला नवी उर्जा मिळत असल्याने या विचारांच्या प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतलाय. हा फक्त पक्षप्रवेश नसून विचारसरणीशी नाळ आणखी घट्ट करणारा प्रवास आहे, अशी भावना यानिमित्ताने डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर काम करतांना भेडसावणाऱ्या समस्या आता राज्यस्तरावर मांडण्याची तसेच त्यावर ठोस उपाययोजना करण्याची संधी मिळणार आहे. जनतेचे प्रश्न थेट मा.आठवले साहेबांपर्यंत मांडून त्यांच्या माध्यमातून त्यांना धोरणात्मक स्वरूप देण्यावर भर राहील, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले. केवळ एका समाजापुरते मर्यादित न राहता सर्व वंचित घटकांना सोबत घेऊन काम करण्याची प्रेरणा मा.आठवले साहेबांच्या व्यक्तिमत्वातून मिळते. महिला, युवक, शेतकरी आणि शहरी गरीब यांच्यासह 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या धोरणानुसार राज्यात पक्ष संघटन आणखी बळकट करणार आहे, असा विश्वास यावेळी डॉ.चलवादी यांनी दिला. आरपीआय (आ) ही बहुजनांच्या हक्कासाठी लढणारे मजबूत विचारपीठ आहे. या विचारपीठावरून अधिक प्रभावी काम करण्याची संधी मिळेल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला. या पक्षप्रवेशामुळे पुणे आणि परिसरातील बहुजन चळवळीला नवी ऊर्जा मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ₹२५ लाखांचे अनुदान वितरण



पुणे (दै. संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या वतीने कोविड-१९ महामारीच्या काळात कर्तव्य बजावताना कोरोनाची लागण होऊन दिवंगत झालेल्या ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रुपये २५ लाखांचे आर्थिक अनुदान आज मा. महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांच्या शुभहस्ते वितरित करण्यात आले.

कोविड-१९ महामारीच्या अभूतपूर्व संकटाच्या काळात महानगरपालिकेचे अनेक कर्मचारी नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असताना स्वतःचा जीव धोक्यात घालून कार्यरत होते. या कालावधीत अनेक कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण होऊन त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेने "कोविड-१९ प्रतिबंध व उपचार सुरक्षा कवच" ही योजना कार्यान्वित केली होती. या योजनेअंतर्गत यापूर्वी ८८ कायम कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५० लाखांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

याच योजनेअंतर्गत कर्तव्य बजावताना कोरोनाची लागण होऊन दिवंगत झालेल्या ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रुपये २५ लाखांचे अनुदान देण्यास मा. मुख्य सभेने मंजुरी दिली असल्याची माहिती मुख्य कामगार अधिकारी श्री. नितीन केंजळे यांनी दिली. मा. महापौरांनी आपल्या मनोगतात दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला अभिवादन केले. कोविडच्या संकटकाळात महानगरपालिकेचे कर्मचारी जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत राहिले. त्यांच्या त्यागामुळे शहरातील आरोग्य व अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवणे शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी मा. सभागृह नेते श्री. गणेश बिडकर यांनी अशा कठीण प्रसंगी मा. मुख्य सभेने त्वरित अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतल्याचे नमूद करून दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

तसेच कामगार कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कंत्राटी कामगारांना अनुदान मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याचे कौतुक करण्यात आले. यामध्ये मुख्य कामगार अधिकारी श्री. नितीन केंजळे, उप कामगार अधिकारी श्री. बुगप्पा कोळी तसेच श्री. प्रशांत चव्हाण, श्री. सुहास शेवते व श्रीमती मनिषा कायटे यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

## वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो विक्रीसाठी उपलब्ध




पुणे (दै. संध्या) : जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने आज आपल्या वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो ची विक्री सुरू केली आहे. हे इयरबड्स उत्कृष्ट नॉईज कॅन्सलेशन आणि दमदार बास परवडणाऱ्या किंमतीत देतात. यांची किंमत रु. ३, ९९९ असून, मर्यादित कालावधीसाठी विशेष लॉन्च किंमत रु. ३,७९९ठेवण्यात आली आहे. हे इयरबड्स वनप्लस डॉट इन , वनप्लस स्टोअर ॲप, वनप्लस एक्स्पिरियन्स स्टोअर्स, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि मिन्त्रा वर उपलब्ध आहेत. वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो हे लोकप्रिय नॉर्ड बड्स मालिकेतील नवीन इयरबड्स असून, ते ५५ डेसिबलपर्यंत नॉईज कॅन्सलेशन देतात, ज्यामुळे अवांछित आवाज पूर्णपणे ब्लॉक होतो. यात नवीन ड्रायव्हर्स दिले आहेत जे नॉर्ड बड्स ३ प्रो पेक्षा १०० टक्के अधिक शक्तिशाली आहेत. तसेच टायटॅनियम कोटिंगमुळे बास अधिक खोल आणि दमदार मिळतो, तर व्होकल्स अधिक स्पष्ट ऐकू येतात. हे इयरबड्स ब्लूटूथ ६. ओ , एलएचडीसी ५.ओ , गूगल फास्ट पेअर आणि मायक्रोसॉफ्ट स्विफ्ट पेअर ला सपोर्ट करतात. फ्लॅगशिप दर्जाचा साऊंड क्वालिटी देण्याबरोबरच, नॉर्ड बड्स ४ प्रो वापरण्यासही अत्यंत सोयीस्कर आहेत.

# ८५० ग्रॅम वजनाच्या अतिदुर्मिळ प्रीमॅच्युअर बालिकेला जीवनदान




पुणे (दै. संध्या) : मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे येथील अत्याधुनिक नवजात अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) मदतीने केवळ ८५० ग्रॅम वजनाच्या आणि अत्यंत गंभीर अवस्थेत जन्मलेल्या नवजात बालिकेला यशस्वीरित्या जीवनदान देत डिस्चार्ज देण्यात आला आहे. ही घटना आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांच्या समन्वयित प्रयत्नांचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे.

ही बालिका अवघ्या २६ आठवडे ४ दिवसांच्या गर्भावस्थेत जन्माला आली होती. जन्मानंतर तिला तातडीने ९ जानेवारी २०२६ रोजी एनआयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. बालिकेची आई मंगला भांगे (वय ४३ वर्षे) यांना पूर्वी अनेक वैद्यकीय गुंतागुंतींचा सामना करावा लागला होता. आयव्हीएफ अपयश, खराब प्रसूती इतिहास, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह (GDM), हायपोथायरॉईडिझम आणि सर्व्हिकल इनकॉम्पिटन्स यांसारख्या समस्यांमुळे ही प्रसूती अतिजोखमीची ठरली होती. प्री-एक्लेम्पसियामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली होती.

ही गुंतागुंतीची प्रसूती डॉ. मधुश्री माने आणि डॉ. शारयू यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. त्यानंतर बालिकेच्या उपचारांची जबाबदारी डॉ. दत्तात्रय कुलकर्णी (निओनॅटोलॉजिस्ट) यांनी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली एनआयसीयू टीमने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत उपचार करत बालिकेची प्रकृती स्थिर केली.

उपचारादरम्यान बालिकेला अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागला. त्यामध्ये रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (RDS) साठी सर्फॅक्टंट, एनआयव्ही, सीपॅप आणि तब्बल २६ दिवस ऑक्सिजन सपोर्ट देण्यात आला. तसेच सबगेलियल ब्लीड, ॲसिनेटोबॅक्टर सेप्सिस, हेमोडायनामिकली सिग्निफिकंट पीडीए, एपनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी आणि ऑस्टिओपेनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी यांसारख्या गुंतागुंतींचे यशस्वी व्यवस्थापन करण्यात आले. संपूर्ण उपचार काळात आईच्या दुधावर आधारित पोषण देण्यात आले.

सुमारे दोन महिन्यांच्या अथक उपचारानंतर बालिका ३५ आठवडे २ दिवसांच्या करेक्टेड गर्भावस्थेपर्यंत पोहोचली असून तिचे वजन वाढून १८२५ ग्रॅम झाले आहे. डिस्चार्जपूर्व तपासणीत ग्रेड १ पीव्हीएल, झोन ३ आरओपी (निरीक्षणाखाली) असून इको अहवाल सामान्य आढळला आहे. सध्या बालिकेची प्रकृती स्थिर असून तिला १० मार्च २०२६ रोजी यशस्वीरित्या डिस्चार्ज देण्यात आला.

या यशामागे एनआयसीयूतील डॉक्टर, आरएमओ, नर्सिंग स्टाफ आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे समन्वयित व समर्पित प्रयत्न महत्त्वाचे ठरले. तसेच डॉ. व्यास मोरया (सेंटर हेड) आणि डॉ. पूजा (मेडिकल सुपरिंटेंडंट) यांच्या नेतृत्वाखाली हॉस्पिटल व्यवस्थापनाचेही मोलाचे सहकार्य लाभले.

ही यशोगाथा केवळ एका बालिकेच्या जीवनरक्षणाची नाही, तर अत्याधुनिक नवजात आरोग्यसेवा आणि तज्ज्ञांच्या कौशल्याची जिवंत साक्ष ठरली आहे.

# महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे

## मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे - रविंद्र चव्हाण, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष



**पुणे (दै. संध्या) :**

■ मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे असे गौरवोद्गार भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे काढले. मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा नुकताच रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र भवन वास्तूच्या विस्तारासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याबाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसच्या दोन दिवसीय दौऱ्यात उच्चस्तरीय मान्यवरांच्या भेटीगाठी घेत भारत-मॉरिशस संबंध अधिक दृढ केले. या दौऱ्यात रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत भारत-मॉरिशस मैत्री, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, AI आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. "मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे," असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच भारताने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

त्याच बरोबर मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफुल, आयटी व इनोव्हेशन मंत्री डॉ. अविनाश रामतोहूल आणि कला व सांस्कृतिक मंत्री महेंद्र गोंदीया यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या. डॉ. रामतोहूल यांनी फर्ग्युसन कॉलेजमधील त्यांच्या शिक्षणाच्या आठवणी सांगत कृत्रिम बुद्धिमत्तेवर त्यांनी लिहिलेले पुस्तक भेट दिले. महाराष्ट्रातील रेशनिंग व्यवस्थेत जीपीएस तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शकता आणण्याच्या निर्णयांचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच मॉरिशसला आफ्रिकेसाठी एआय क्षेत्राचे 'प्रवेशद्वार' बनवण्यासाठी भारताचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर सांस्कृतिक देवाण-घेवाण, वाचनालय, जागरी नृत्याचे युनेस्को नामांकन यांसारख्या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली. या दौऱ्याचा विशेष ठळक भाग म्हणजे मोका येथे "महाराष्ट्र भवन" विस्तारित वास्तूचा शिलान्यास सोहळा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ८ कोटी रुपयांच्या निधीतून उभारल्या जाणाऱ्या या वास्तूमुळे जागतिक स्तरावर मराठी अस्मिता अधिक बळकट होणार आहे. या वास्तूतील सभागृहाला "स्वातंत्र्यवीर सावरकर" यांचे नाव देण्यास स्थानिक समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनतर्फे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम, "महा गणेशोत्सव २०२५" निमित्त अनुदान वितरण आणि भारताचे मॉरिशसमधील उच्चायुक्त अनुराग श्रीवास्तव यांच्यासमवेत 'बिहार फेस्टिव्हल'ला दिलेली भेट या माध्यमातून सातासमुद्रापार भारतीय संस्कृतीचा जागर अधिक बळकट झाला. या सर्व घडामोडींमुळे महाराष्ट्र-मॉरिशस स्नेहबंधाचा नवा अध्याय लिहिला जात असल्याचा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला.

मॉरिशसमधील खासदार अर्विन बाबाजी, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे मुख्य धर्मगुरु गुरुजी संताराम राजू, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे अध्यक्ष बलराज नारू, मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्टचे अध्यक्ष धनीराव भिवाजी, मॉरिशसमधील मराठी स्पिकिंग युनियनचे अध्यक्ष भालचंद्र गोविंद अशा अनेक उचचपदस्थ मराठी मंडळींशी दौऱ्याच्या निमित्ताने विविध विषयांवर रविंद्र चव्हाण यांनी चर्चा केली. तसेच मेलरोझ श्री गजानन सरस्वती मंदिर, मॉंट रोचेस मराठी मित्र मंडळी, विठोबा रखुमाई मराठा मंदिर, डागोटियर मराठी शिव मंदिर, लेसपेरान्स मराठी गणोबा मंदिर, प्रोव्हिडेन्स मराठी मित्र मंडळ आणि पाल्मा मराठी सभा या संस्थांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने रविंद्र चव्हाण यांनी अनुदानाचे धनादेश सुपूर्द केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग यांनी बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा घेतला आढावा

पुणे(दैनिक संध्या) : बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक दि. २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून, त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून नियुक्त जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग यांनी तहसिल कार्यालय बारामती येथे बैठक घेऊन निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा घेतला. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांकडून निवडणुकीची पूर्वतयारी, कायदा व सुव्यवस्था, भरारी पथक (FST) व स्थिर देखरेख पथक (SST) यांचे नियोजन, तसेच आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी याबाबत तपशीलवार माहिती घेण्यात आली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी, यासाठी आवश्यक त्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. बारामती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी निवडणुकीसंदर्भात काही तक्रारी अथवा सूचना असल्यास जनरल निरीक्षक बिद्यानंद सिंग (मो. ७६६६६३९८५९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.

### सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेजमध्ये शहीद दिन संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व विध्यार्थी विकास मंडळ विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशासाठी बलिदान दिलेल्या शहीदांना अभिवादन करून आपले विचार मांडले. कार्यक्रमात चैतन्य अरुडे (बी.ए. एलएल.बी. प्रथम वर्ष), चेतन शिंदे (एलएल.बी. तृतीय वर्ष), रेनुका खंडागळे(बी.ए. एलएल.बी. तृतीय वर्ष), अजय शिंदे (बी.ए. एलएल.बी. तृतीय वर्ष), विकास गवते (एलएल.बी. तृतीय वर्ष) तसेच उपेंद्र माहतो(एलएल.बी. प्रथम वर्ष)यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपमाला उगले (बी.ए. एलएल.बी. प्रथम वर्ष) यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांनी शहीदांच्या बलिदानाचे महत्त्व अधोरेखित करत प्रेरणादायी विचार मांडले. हा कार्यक्रम माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील (संस्थापक अध्यक्ष, HURSPMs), सौ. सुरेखाताई मोहिते पाटील (खजिनदार, HURSPMs) व माजी प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते (सचिव, HURSPMs) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. किरण काळे, प्रा. संदीप तायडे, प्रा. श्रद्धा सोनारिकार, प्रा. प्राजक्ता घोलप, प्रा. सलोनी वाडेकर, प्रा. अभिजीत वैद्य, प्रा. ऋतुजा मून, प्रा. ऐश्वर्या बोरकर तसेच ग्रंथपाल ज्योती बच्छे उपस्थित होते. याशिवाय, शिक्षकेतर कर्मचारी अभिजीत शेवाळे, संगीता बोम्बले, पार्वती शिंदे, पूर्णिमा भगत, उल्हास पानमंद व ज्ञानेश्वर हिंगे यांनीही उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचा समारोप रोहित जयभाये यांनी आभार प्रदर्शन करून करण्यात आला.




### 95 वा शहीद दिन साजरा

मुंबई (दैनिक संध्या) : थोर क्रांतीकारक भगतसिंह राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यसाठी दिलेल्या बलीदानाच्या स्मृती प्रित्यर्थ पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ यांच्या वतीने मंत्रालया जवळील हुतात्मा राजगुरु चौक येथे थोर क्रांतीकारक भगतसिंह राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,मुंबई जिल्हाधिकारी अंचल गोयल, वडगांव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, पिंपरी चिंचवडचे आमदार शंकरराव जगताप,ठाण्याचे आमदार निरंजन डावखरे इ.मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर ,उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज, खजिनदार महेंद्रशेठ गडगे, समृद्धी जंगम, मेघना चौधरी, पद्मा नवले,चंद्रकांत शिंदे, शांताराम सावंत,भरत शिंदे, गणेश काळे या सर्वांनी विशेष परिश्रम घेवून कार्यक्रम यशस्वी केला.

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**वीज उपकेंद्रासाठी जागा पाहिजे**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे निवेदन करण्यात येते की, पुरंदर तालुक्यातील पिंपळे ता. पुरंदर परिसरातील वीज ग्राहकांच्या सेवेसाठी नवीन 33/22 केव्ही वीज उपकेंद्राची उभारणी तातडीने करण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी 4000 चौ. मी. जागेची शक्यतो चौकोनी आकार असलेली व सार्वजनिक रस्त्यालगत असणारी, पिंपळे तसेच लगतच्या गावामध्ये असलेल्या जागेची आवश्यकता आहे. वरील वर्णनानुसार जागा विकत देऊ इच्छिणाऱ्या जागा मालकांनी आपल्या जागेच्या प्रमाणीत कागदपत्रासह महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या, विभागीय कार्यालय, पारगाव रोड, सासवड येथे संपर्क साधावा. **(संपर्क क्र. 7875768006)**

PRO No:-PRO/BMTZ/230/25-26 — कार्यकारी अभियंता, सासवड विभाग

# Amazon MX Player कडून 'फटाफट' लॉंच — भारतात मायक्रो-ड्रामा आता पूर्णपणे मोफत

**पुणे (दै. संध्या) :**

भारताची अग्रगण्य मोफत प्रीमियम स्ट्रीमिंग सेवा Amazon MX Player कडून आज 'फटाफट' लॉंचची घोषणा करण्यात आली. हा एक नवीन मायक्रो ड्रामा प्लॅटफॉर्म असून, जलद, रंजक आणि लहान स्वरूपातील कथा पाहण्याचा आनंद घेणाऱ्या मोबाइल फर्स्ट प्रेक्षकांसाठी विशेषतः तयार करण्यात आले आहे.




'फटाफट'च्या माध्यमातून Amazon MX Player वेगाने वाढणाऱ्या मायक्रो ड्रामा श्रेणीत प्रवेश करत आहे आणि भारतात प्रथमच प्रीमियम, सिरीजयुक्त मायक्रो-ड्रामे पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देत आहे. या लॉंचमुळे देशभरातील प्रेक्षकांना कोणत्याही शुल्काशिवाय उच्च गुणवत्तेचे मनोरंजन उपलब्ध करून देण्याच्या Amazon MX Player च्या वचनबद्धतेला अधिक बळ मिळते.

मायक्रो ड्रामा हा जलद गतीने वाढणारा जागतिक फॉर्मेट म्हणून उदयास आला आहे, ज्यामध्ये लहान, वेगवान भाग असतात आणि जे मोकळ्या वेळेत सहज पाहता येतात. आज बहुतेक मायक्रो ड्रामा प्लॅटफॉर्म्स सशुल्क असताना, 'फटाफट' अडथळा दूर करत भारतातील लाखो प्रेक्षकांसाठी हा फॉर्मेट अधिक सुलभ करत आहे.

आजच्या मोबाइल फर्स्ट पाहण्याच्या सवयी लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या 'फटाफट'मध्ये रोमान्स, ड्रामा, थ्रिलर आणि युवा-केंद्रित कथांसह विविध शैलींतील सिरीज स्वरुपात मायक्रो ड्रामाचा वाढता कॅटलॉग उपलब्ध आहे. यातील भाग लहान, वेगवान आणि सहज बिंज वॉच करता येण्याजोगे असल्याने प्रेक्षक कधीही, कुठेही रोचक कथांत रमू शकतात.

या लॉंचच्या निमित्ताने Amazon MX Player ने मुनव्वर फारुकी यांच्यासह एक नवीन ब्रँड कॅम्पेन सादर केला आहे. सोप्या आणि सहज ओळखता येणाऱ्या कल्पनेवर आधारित हा कॅम्पेन विनोदी पद्धतीने दाखवतो की मायक्रो ड्रामा ॲप्सवर प्रेक्षक जे छोटे-छोटे खर्च करतात, ते इतरत्र अधिक चांगल्या प्रकारे वापरता येऊ शकतात. Amazon MX Player च्या 'फटाफट'सोबत आता छोट्या-छोट्या मनोरंजनासाठी पैसे देण्याची गरज नाही हा संदेश हलक्याफुलक्या प्रसंगांमधून मुनव्वर देतात. Amazon MX Player चे प्रमुख करण बेदी म्हणाले, "Amazon MX Player मध्ये प्रीमियम मनोरंजन सर्वांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यावर आमचा भर राहिला आहे. आम्ही 'फटाफट'च्या माध्यमातून वेगाने वाढणाऱ्या मायक्रो-ड्रामा श्रेणीत विस्तारत आहोत. या कथा आजच्या प्रेक्षकांच्या कंटेंट पाहण्याच्या पद्धतीनुसार तयार केल्या आहेत. जलद, आकर्षक आणि मोबाइल-फर्स्ट आणि त्या संपूर्ण भारतातील प्रेक्षकांसाठी पूर्णपणे मोफत आहेत."

Amazon MX Player चे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "मायक्रो-ड्रामामुळे कथाकथनासाठी रोमांचक आणि नव्या सर्जनशील शक्यता खुल्या होतात. आम्ही 'फटाफट'द्वारे विविध शैलींमध्ये सिरीज स्वरुपातील कथांचा समृद्ध संच तयार करत आहोत, जो जलद, आकर्षक आणि सर्वत्र प्रेक्षकांसाठी सहज उपलब्ध आहे."

कॅम्पेनचा भाग झाल्याबाबत मुनव्वर फारुकी म्हणाले, "या कॅम्पेनचा भाग बनण्याचा अनुभव माझ्याकरिता अत्यंत आनंददायी होता. आजच्या मनोरंजनाची दुनिया ही जलद, आकर्षक आणि तत्काळ उपलब्ध असलेल्या कंटेंटने परिभाषित होते.

तसेच Amazon MX Player 'फटाफट'ने हे उत्तमरितीने जमवून आणले आहे. या कॅम्पेनचे शूटिंग खूप मजेदार होते. विशेषतः कारण त्यातील प्रसंग अत्यंत वास्तव आणि साजेसे वाटले. विविध शैलींतील संक्षिप्त, प्रभावी आणि ताज्या कथांमधून सादर होणारी वेगळी कथनशैली ही 'फटाफट'ची खासियत म्हणावी लागेल.

ज्यामुळे प्रेक्षक सहजपणे, कधीही त्यात रमू शकतात. त्याचप्रमाणे हा संपूर्ण अनुभव Amazon MX Player वर मोफत उपलब्ध असल्यामुळे अधिकच आकर्षक ठरतो."

आगामी महिन्यांत 'फटाफट' अनेक नव्या टायटलसह आपला कॅटलॉग विस्तारत राहील आणि देशभरातील प्रेक्षकांसाठी मायक्रो-ड्रामांची समृद्ध आणि सातत्याने वाढणारी लायब्ररी उभी करेल.

प्रेक्षक Amazon MX Player च्या मोबाइल ॲपवर 'फटाफट' मोफत स्ट्रीम करू शकतात.

# अल्पसंख्यांक पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**पुणे (दै. संध्या) :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत २७ मार्च २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ, समर्थ पोलीस ठाणे समोर, पुणे येथे सकाळी १० वाजता अल्पसंख्यांक पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील ५ उद्योजकांनी त्यांचा सहभाग दर्शविलेला असून, त्यांच्याकडून २५० पेक्षा जास्त रिक्तपदे भरण्यात येणार आहे. ही सर्व रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, पदवीधर, डिप्लोमा अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी असून पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक व बेरोजगार उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी रिक्तपदांबाबत अधिक माहिती करुन घेण्यासोबतच अर्ज करण्याकरिता www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. खाजगी क्षेत्रातील विविध रिक्तपदांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी अधिकाधिक नोकरी इच्छुक रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून, आपला सहभाग नोंदवावा व या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा.

## मुली बेपत्ता प्रकरणे वाढली

**पुणे (दै. संध्या) :** राज्यात महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक असून, याबाबत सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत मंगळवारी केली. सरकारने वाढत्या मानवी तस्करीबाबत तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, असे त्यांनी नमूद केले. खासदार प्रा. कुलकर्णी म्हणाल्या, "गृह विभागाच्या आकडेवारीनुसार २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांत ९३ हजार ९४० महिला व मुली बेपत्ता झाल्या आहेत. यापैकी २३ हजारांहून अधिक अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. दररोज सरासरी १३२ महिला बेपत्ता होत असल्याचे आढळले आहे. मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई यांसह पुण्यातही अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. पुणे शहरातच गेल्या १५ दिवसांत १३ ते १७ वयोगटातील २० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे.

## आळंदी नगरपरिषद कार्यालय

आळंदी देवाची, ता. खेड, जि.पुणे- ४१२१०५
Email-ID : alandimc2@gmail.com

जा. क्र. आनप/लेखा/४०३७/२०२६ — दि. २४/०३/२०२६

**जाहीर निविदा प्रसिध्दीकरण**

आळंदी नगरपरिषद लेखा विभागाकडील खालील नमुद कामाकरिता सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८या आर्थिक वर्षाकरिता टॅक्स कन्सल्ट यांच्याकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. याबाबत कोरी निविदा संच शासकीय कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कालावधीत विनापरतीच्या मोबदल्यात लेखा विभागाकडे उपलब्ध होतील. को-या निविदा यांची किंमत रोखीने स्वीकारली जाईल. मंजुर निविदा धारकास योग्य त्या किंमतीच्या मुंद्रक शुल्कावर स्वखर्चाने करारनामा व नियमाप्रमाणे अनामत भरावी लागेल

| अ. क्र. | कामाचा/पुरवठा तपशील | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|
| 1 | आळंदी नगरपरिषेदचे सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८या आर्थिक वर्षाकरिता दुहेरी लेखा नोंद करिता Balance Sheet, Receipt & Payment Statement, Cash Flow Statement व दुहेरी लेखा नोंदीचे इतर अनुषंगिक कामे याकरिता सनदी लेखापालची नेमणूक करणे. | २०,०००/- | ५००/- |
| 2 | आळंदी नगरपरिषद कार्यालयात शासनाचे नियमाप्रमाणे देय असणरे सर्व प्रकारचे टॅक्स कन्सलंटचे काम पाहणे (आयकर, जीएसटी, व्यवसाय कर, ईपीएफ, तसेच आयकर केसेस) या करिता कर सल्लागार यांची नेमुणक करणे. | ५,०००/- | ५००/- |

१) निविदा फॉर्म नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध व स्वीकृती होण्याचा दि- २५/०३/२०२६ ते०८/०४/२०२६रोजी सायंकाळी ५:०० वाजे पर्यंत
२) निविदा लिफाफा १ व २ उघडण्याचा दि ०८/०४/२०२६ सायंकाळी ०५:३० पर्यंत
वरील प्रत्येक कामासाठी आवश्यक अटी शर्तीव इतर माहिती निविदा संचामध्ये नमुद केलेल्या आहेत. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे आधिकार आळंदी नगरपरिषदेने ठेवले आहेत.

सही/-
माधव खांडेकर
आळंदी नगरपरिषद, आळंदी

## पुणे महानगरपालिका, पुणे

भवन रचना विभाग
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात - फेर निविदा कामे

१) ई-निविदा विक्री कालावधी : २५/०३/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०१/०४/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ : २५/०३/२०२५ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०१/०४/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक : २०/०३/२०२५ दुपारी ३.०० वा. वाजेनंतर

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रूपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम.सी./भवन /२४६/२०२५-२६ | भवन रचना विभाग | प्रभाग क्र. १९ लहुजी क्रीडा संकुल फिटनेस सेंटर येथे विविध विकास कामे करणे व साहित्य खरेदी करणेस. | २८७३०७३ | २८७३१ | ४ महिने (पावसाळा कालावधीसह) | १३५९ | श्री. रमीज फरास ८८३०७११७७९ |

टिप : जाहिरात क्र. २/१४२८ दिनांक ०५.१२.२०२५ रोजीच्या यापूर्वी मजकूर हा वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेला आहे.

(स्वाक्षरी/-)
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/१८४० दि. २४/०३/२०२६

**प्राधिकरणाकडील आदेश जा. क. २०२६/१०७५० दिनाक २०/०३/२०२६ चे आदेशानुसार बोरजाईदेवी विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बोऱ्हाळवाडी ता. पुरंदर जि. पुणे**

दि.२४.०३.२०२६

## सभेची नोटीस

बोरजाईदेवी विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या बोऱ्हाळवाडी ता. पुरंदर जि. पुणे या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येते की आपल्या सहकारी संस्थेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार चेअरमन / व्हा. चेअरमन या पदाच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षेतखाली दि.०७.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पुरंदर यांचे कार्यालय या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात येत आहे सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेस संचालकामधून निवडावयाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी खालील प्रमाणे निवडणुक कार्यक्रमानुसार करण्यात येणार आहे.

**निवडणुक कार्यकम**

| अ. क्र. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती | दुपारी १२.३० ते १२.४५ |
| २. | नामनिर्देशन छानणी | दुपारी १२.४५ ते १.०० |
| ३. | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिदथ | दुपारी १.१५ |
| ४. | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १.१५ ते १.३० |
| ५. | अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे | दुपारी १.३५ |
| ६. | मतदान प्रक्रिया | दुपारी १.३५ ते २.०० |
| ७. | मतमोजणी प्रकिया | दुपारी २.०० ते २.३० |
| ८. | निवडूण आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे | मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर लगेच |

टिप :- निवडणुक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

(मा. अध्यासी अधिकारी यांच्या मान्यतेने)

सचिव
बोरजाईदेवी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या बोऱ्हाळवाडी

ठिकाण :- बोऱ्हाळवाडी
दिनांक :- २४.०३.२०२६

## ग्रामपंचायत कोडीत बु ता. पुरंदर जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत कोडीत बु, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोडीत बु ता. पुरंदर जि.पुणे यांच्याकडुन दिनांक २५/०३/२०२६ ते दिनांक ०१/०४/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोडीत बु येथील अंतर्गत रस्ता दुरुस्त करणे. | १९८९६१/- | दि २५/०३/२०२६ ते दि ०१/०४/२०२६ | २३६/- | १९९०/- |
| २ | कोडीत बु अंतर्गत सिमेंट रस्ता करणे. | ४९९९३०/- | | ५९०/- | ४९९९/- |
| ३ | सोमवती मार्ग रस्ता दुरुस्ती करणे. | १९८९६१/- | | २३६/- | १९९९/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोडीत बु PDCC बँक शाखा सासवड खाते क्र.००६००२५०००००३२ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. २) निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोडीत बु यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी — सरपंच
ग्रामपंचायत कोडीत बु. ता पुरंदर जि पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विनापरवाना विदेशी दारूचा मोठा साठा जप्त...

दिघी (दैनिक संध्या) :गुन्हे शाखा युनिट-३ ने दिघी पोलीस स्टेशन हद्दीत धाड टाकून विनापरवाना विदेशी दारूचा मोठा साठा जप्त करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कारवाईत सुमारे दोन लाख ४८० रुपये किमतीची दारू तसेच तीन मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या नेतृत्वाखाली पथक पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार सोमनाथ बोऱ्हाडे यांना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार दाभाडे सरकार चौकाजवळील देवेंद्र तापकीर यांच्या शेतातील शेडमध्ये अवैध विदेशी दारू साठवून विक्री केली जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

यानंतर पोलिसांनी सापळा रचून छापा टाकत रामप्रसाद साळुंखे (वय ३३), तिलक पटेल (वय २१) आणि अनिल यादव (वय २४) या तिघांना रंगेहात पकडले. त्यांच्या ताब्यातून रॉयल चॅलेंज, इम्पेरियल ब्ल्यू आणि रॉयल स्टॅग या ब्रँडच्या दारूचे एकूण २० बॉक्स तसेच गोण्यांमध्ये भरलेल्या शेकडो बाटल्या असा मोठा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी दिघी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त गुन्हे डॉ. शिवाजी पवार आणि सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या सूचनेनुसार पार पडली. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक सुनिल जावळे, पोलीस अंमलदार सोमनाथ बोऱ्हाडे, सागर सुर्यवंशी, श्रीधन इचके, शशिकांत नांगरे, समिर काळे, राजकुमार इघारे व निखील फापाळे यांनी संयुक्तपणे केली.



### महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग 2026 चे उत्साहात उद्घाटन...

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग या स्पर्धेमुळे भोसरी परिसरातील युवकांना आपली क्रीडा कौशल्ये सादर करण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. स्थानिक पातळीवर अशा स्पर्धा सातत्याने आयोजित झाल्यास खेळाडूंमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मकता आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहाशेजारील गावजत्रा मैदानावर राजमुद्रा क्रिकेट क्लबच्या वतीने स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते. महापौरांच्या हस्ते खेळपट्टीचे पूजन करून स्पर्धेची औपचारिक सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमास आयोजक कैलास लांडगे यांच्यासह मधुकर महाराज साखरे, गणेशभाऊ भालेकर, स्वप्नीलभाऊ लांडगे, आनंदभाऊ चव्हाण, सचिनभाऊ लांडगे, आनंदभाऊ आरबुज, राहुलभाऊ लांडगे, संजयमामा पवार, शिवाजीभाऊ देवकुळे, संतोषभाऊ लांडगे, सतीशभाऊ लांडगे तसेच विविध संघांचे संघमालक, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, क्रिकेटसारख्या खेळांमधून संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित होतो. ही मूल्ये समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असून अशा उपक्रमांमुळे युवकांना सकारात्मक दिशा मिळण्यास मदत होते. दरम्यान, या स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी ९१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. तसेच 'मॅन ऑफ द सिरीज' विजेत्यास दुचाकी, तर अंतिम सामन्यातील 'मॅन ऑफ द मॅच' खेळाडूस सायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिका सक्षम, मोठ्या प्रकल्पांसाठी निधी उभारणे शक्य - आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे कामकाज करताना विविध आव्हाने आणि प्रश्न समोर येत असले, तरी शहराच्या आर्थिक स्थितीबाबत चिंता करण्याचे कारण नसल्याचे प्रतिपादन महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत सक्षम असून, एकूण आर्थिक रेटिंगही चांगले असल्यामुळे येणाऱ्या काळात मोठ्या प्रकल्पांसाठी निधी उभारणे सहज शक्य होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या वतीने नवनियुक्त आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन कै भा वि कांबळे पत्रकार कक्षामध्ये करण्यात आले. पत्रकार संघांचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गोरे यांनी आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांचे शाल व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. पत्रकार संघाच्या अध्यक्षा सायली कुलकर्णी,ज्येष्ठ पत्रकार नाना कांबळे, बाळासाहेब ढसाळ, सुनील उर्फ बाबू कांबळे इत्यादी पत्रकार उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले की "शहराची वाढ दरवर्षी सुमारे ५ टक्क्यांनी होत असल्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरवर ताण वाढत आहे. पाण्याची वाढती गरज, अतिक्रमण, बेकायदा बांधकामे यांसारख्या समस्या समोर आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी काळात महत्त्वाचे प्रकल्प राबविण्यासाठी काटेकोर नियोजन सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

महापालिकेचे बजेट मंजूर झाल्यानंतर पुढील वर्षी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प उभारले जाणार असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासन गांभीर्याने काम करत आहे. त्यासाठी स्वतः मी दररोज विविध विभागांच्या बैठकांद्वारे माहिती घेत असून, प्रत्येक विभागाचे काम बारकाईने समजून घेत असल्याचे त्यांनी नमूद केले.



सध्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून, त्यासाठी पत्रकार व नागरिकांची साथ आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "काही चुकीचे वाटल्यास नक्की टीका करा; मात्र चांगल्या कामाचीही दखल घ्या," असे आवाहन त्यांनी केले.

पत्रकारांना त्यांनी महापालिकेचे "एक्सटेंडेड आयज अँड इअर्स" संबोधत, फिल्डवरील वास्तव परिस्थिती प्रशासनापर्यंत पोहोचविण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगितले. पत्रकारांकडून मिळणाऱ्या फीडबॅकमुळे त्रुटी तत्काळ दुरुस्त करता येतात, असेही त्यांनी नमूद केले.

शहरातील खराब रस्त्याबाबत प्रसिद्ध झालेल्या बातमीची तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या आणि लगेचच दुरुस्ती करण्यात आल्याचा दाखला देत,प्रशासन व माध्यमांमध्ये सकारात्मक आणि हेल्दी रिलेशन राहतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टीका ही व्यक्तीवर नसून सिस्टीममधील त्रुटींवर असते, त्यामुळे टीकेचे स्वागतच असल्याचे सांगत, त्यातूनच प्रशासनाला उणिवा समजून सुधारणा करता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या विविध विभागांचे कामकाज अत्यंत चांगल्या पद्धतीने चालत असून, त्याचा हेवा इतर महानगरपालिकांना वाटतो, असे गौरवोद्गारही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी काढले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार नाना कांबळे, बाळासाहेब ढसाळ यांची भाषणे झाली.

कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघांचे उपाध्यक्ष विनय लोंढे,गणेश शिंदे, रेहान सय्यद,चिटणीस संतोष जराड,सह चिटणीस मुकेश जाधव, कार्यकारिणी सदस्य प्रसाद बोरसे, जितेंद्र गवळी, अशोक लोखंडे, अमोल डंबाळे, पत्रकार प्रविण शिर्के,दिलीप देहाडे,देवा भालके,माधव सहस्त्रबुद्धे,अविनाश कांबीकार,विवेक कुलकर्णी,अर्चना मेंगडे,दिनेश दुधाळे, गणेश मोरे,विशाल जाधव, श्रद्धा प्रभुणे, सबनम सय्यद,सोमनाथ काळे, भीमराव बरकडे,निलेश सायंकर इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बापूसाहेब गोरे यांनी केले आभार डिजिटल मीडियाचे अध्यक्ष सूरज साळवे यांनी मानले.

## PMPML बस कंत्राट प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात

## प्रशासकीय घाई आणि आर्थिक अनागोंदीवर आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात वेधले सरकारचे लक्ष!

**पिंपरी (दै. संध्या) :**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या कार्यपद्धतीवर आणि सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रक्रियेतील पारदर्शकतेवर आमदार अमित गोरखे यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विधानपरिषदेत त्यांनी या प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय अनागोंदीवर सरकारचे लक्ष वेधले.

पीएमपीएमएलच्या निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. नियमानुसार सुरक्षा ठेव म्हणून 'बँक गॅरंटी' स्वीकारणे अपेक्षित असताना, केवळ 'चेक' स्वीकारण्यामागील नेमकी तांत्रिक बाजू काय आहे, याचे स्पष्टीकरण



प्रशासनाने देणे गरजेचे आहे. तसेच, सीएनजी बस खरेदीचा करार ज्या वेगाने पूर्ण झाला, त्यामागे नेमकी प्रशासकीय निकड काय होती, यावरही प्रशासनाने प्रकाश टाकावा. एकाच कंत्राटदाराला सातत्याने मोठी कामे मिळणे, हे त्या कंत्राटदाराच्या कार्यक्षमतेचे निदर्शक असू शकते, मात्र या संपूर्ण प्रक्रियेत नियमांचे पालन झाले आहे का, याची सखोल शहानिशा होणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रशासनाने या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती समोर आणावी, अशी आग्रही मागणी आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात केली आहे.

मंत्री उदय सामंत यांचे उत्तर...

या विषयावर उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी ही प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगत, तत्कालीन सीएमडी देवरे यांची बदली झाल्याचा उल्लेख केला. मात्र, केवळ बदलीने ही जबाबदारी संपत नाही. या निविदा प्रक्रियेला मान्यता कोणी दिली, त्यामागील तारखांचा मेळ काय आणि चेक स्वीकारण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्याने घेतला, या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

## दिवंगत अण्णासाहेब पाटील यांचे कार्य सदैव प्रेरणादायी-महापौर रवि लांडगे

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने थोर कामगार नेते, माजी आमदार दिवंगत अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज के.एस. बी.चौक, चिंचवड येथील पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेवक कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे यांच्यासह महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच अण्णासाहेब पाटील माथाडी संघटनेचे माजी अध्यक्ष पोपटराव धोंडे, सचिव कृष्णात पाटील, दुर्गेश पाटील, अमोल पाटील, किशोर सातकर, सुनील राणा, मच्छिंद्र चौधरी, शंकर शेलार, राहुल तापकीर, विजय शेटे, विजय गायकवाड यांच्यासह माथाडी कामगार, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी दिलेला लढा व योगदान सर्वश्रुत आहे, याशिवाय आयुष्यभर माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी लढा देत त्यांना सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या कार्यामुळे कामगार चळवळीला नवी दिशा मिळाली. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करणे गरजेचे आहे. कामगारांच्या हक्कांचे संरक्षण व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका कटिबद्ध असून त्यासाठी अण्णासाहेब पाटील यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहील." असे महापौर रवि लांडगे म्हणाले.

## रहाटणीतील आगीत बाधित धेंडे कुटुंबाला भाजप नगरसेवकांचा मदतीचा आधार!



### आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक मदत प्रदान

**पिंपरी (दै. संध्या) :**

रहाटणी येथील पवना नगर परिसरात राहणाऱ्या सपना बाळासाहेब धेंडे यांच्या घराला रविवारी (दि. २२ मार्च) शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. या आगीत घरातील साहित्य, आवश्यक वस्तू तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा आधार मोठ्या प्रमाणात जळून खाक झाला.

या दुर्दैवी घटनेची दखल घेत आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक नगरसेवकांनी तातडीने मदतीचा हात पुढे केला. नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य बाबासाहेब त्रिभुवन, सहकारी नगरसेविका सविता खुळे आणि माजी स्वीकृत सदस्य गोपाळ माळेकर यांनी धेंडे कुटुंबाची भेट घेऊन त्यांना आर्थिक मदत प्रदान केली. यावेळी कुटुंबाला धीर देत पुढील काळातही आवश्यक ती मदत मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले.

दरम्यान, प्रशासनाकडूनही घटनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे. तलाठी प्रीती शेवाळे यांनी तहसीलदार जयराज देशमुख यांच्या आदेशानुसार पंचनामा पूर्ण केला असून, धेंडे कुटुंबाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विशेषतः संजय गांधी निराधार योजनेतून आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी आमदार शंकर जगताप यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते नरेश आप्पा खुळे, ऋषी नखाते, सुनील नखाते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माथाडी कायद्याचे जनक स्व. आ. अण्णासाहेब पाटील स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

# कामगार चळवळीला नवी दिशा देण्याचा संकल्प

**पिंपरी (दै. संध्या) :**

माथाडी कायद्याचे जनक स्व. आ. अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा जागर करण्यात आला.

यावेळी के. एस. बी. चौक, चिंचवड येथे स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद म्हणाले की, "स्व. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांना हक्काचे स्थान मिळवून दिले. त्यांचे कार्य प्रेरणादायी असून आजही कामगारांच्या संघर्षाला दिशा देणारे आहे."

कार्यक्रमास महाराष्ट्र मजदूर संघटनेचे उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, जनरल सेक्रेटरी प्रविण जाधव यांच्यासह मातोश्री पतसंस्था अध्यक्ष पांडुरंग कदम, पांडुरंग काळोखे, अप्पा कौदरे, सर्जेराव कचरे, हनुमंत तरडे, पांडुरंग पठारे, अशोक साळुंखे, रायरेश्वर पतसंस्था अध्यक्ष सतीश कंटाळे, गोरक्ष दुबाले, समर्थ नाईकवाडे, नागेश व्हनवटे, मनोज मंजाळ, अमित पासलकर, बबन काळे, दादा कदम, उद्धव सरोदे, माऊली पाचपुते, श्रीकांत मोरे, भारत मंजाळ, विश्वनाथ गांगड, गुलाब शिंदे, विक्रम मोरे, नाना नाईकवाडे, विजय खंडागळे, गिरीश देशमुख, रतन भोजने, आयुष शिंदे, गणेश नाईकवाडे, भरत मंजाळ तसेच सर्व पदाधिकारी, विविध माथाडी टोळ्यांचे मुकादम व मोठ्या संख्येने सभासद कामगार उपस्थित होते.



## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कर्ज अन् दायित्वबाबत स्पष्ट खुलासा करावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

महापालिकेच्या अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेत माजी महापौर राहुल जाधव यांनी महापालिकेवरील कर्ज आणि दायित्वाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत प्रशासनाकडून सविस्तर खुलासा करण्याची मागणी केली.

गेल्या काही दिवसांत प्रसारमाध्यमांमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सुमारे ६ हजार कोटी रुपयांच्या दायित्वाखाली असल्याच्या बातम्या वारंवार प्रसिद्ध होत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

सभागृहात प्रश्न उपस्थित करताना त्यांनी विचारले की, प्रत्यक्षात महापालिकेवर किती कर्ज आहे आणि एकूण दायित्व किती आहे, याची स्पष्ट आणि अधिकृत माहिती प्रशासनाने द्यावी. अपूर्ण किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे शहराची प्रतिमा खराब होत असल्याचीही त्यांनी खंत व्यक्त केली.

तसेच, महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, जाधव यांनी पुढे विचारले की, वाढत्या दायित्वाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासनाने कोणत्या ठोस उपाययोजना आखल्या आहेत? आर्थिक शिस्त राखण्यासाठी कोणते धोरण अवलंबले जात आहे? याबाबतही सविस्तर माहिती सभागृहात सादर करावी. महापौर आणि आयुक्तांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव यांनी बीआरटी, टीपी, रस्ते विकसित करताना विविध विभागांचा समन्वय सक्षम असावा. नवीन डीपी लागू करताना ताब्यात असलेली आरक्षणे विकसित झाली पाहिजे, याकडे लक्ष वेधले. विकासकामे करताना एखादा अधिकारी स्वतः:ला मोठा समजत असेल, तर महापालिकेचे नुकसान आहे. महापालिकेच्या मिळकतींचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### डिकसळच्या उपसरपंचपदी पूजा पोंदकुले बिनविरोध




भिगवण (दैनिक संध्या) : डिकसळ ( ता.इंदापुर) येथील रिक्त झालेल्या उपसरपंच निवडणुकीसाठी सोमवार ( ता.23 )रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता यावेळी निर्धारित वेळेत पूजा गोरख पोंदकुले यांचा एकमेव अर्ज आल्याने डिकसळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पोंदकुले यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी प्रतिभा देवकाते यांनी जाहीर केले. यावेळी ग्रामपंचायतचे सर्व सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर गावातील अपंग व्यक्तींना टेबल पंख्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना उपसरपंच पूजा गोरख पोंदकुले यांनी सांगितले की येणाऱ्या काळात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्यामार्फत मोठा निधी आणला जाईल. त्यानंतर योगेश्वरी माता मंदिर येथे त्यांचा गावकऱ्यांच्या व ग्रामपंचायतच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### बारामतीच्या आठ खेळाडूंची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड

बारामती (दैनिक संध्या) :नुकत्याच पुणे जिल्हा तायक्वांदो असोसिएशनच्या वतीने दुसरी जिल्हास्तरीय निवड तायक्वांदो स्पर्धा दिनांक 21 ते 22 मार्च २०२६-२७ चे आयोजन जेजुरी येथील शिवम मंगल कार्यालया मध्ये करण्यात आले होते. त्याच्यामध्ये बारामती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करीत आठ सुवर्णपदक मिळवले. बारामती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीतील आठ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. राज्यस्तरीय निवड खेळाडू 1) सुवर्णपदक विजेते - आरोही जंत्रे,पार्थ मोरे,आयुष धुमाळ, संयोग पंढरपट्टे,अर्णव घुले, शर्विल जोशी,श्रीतेज बोबडे, शंभू शिंदे 2) रौप्यपदक विजेते - स्मित नांगरे,ईश्वरी हिंगसे,भूमी पिंगळे, स्वरा येळे,सानवी बांडराव, तनिष्क कुंभार,सार्थक ताकमोगे,शरयू माने,अर्पित लोणकर,अद्विका कांबळे,प्रेरणा ईश्वरे 3)कांस्यपदक विजेते - कीर्ती राठोड,प्राची बोकसे,आरती खैरे, उन्नती शाह,ओजस आगवणे, प्रज्वल शिंदे,शिवांश जाधव, आदर्श सोनवणे,आरुष लोंढे, राधिका राठोड,राजवर्धनी चांदगुडे,निहारिका बनसोडे या यशाबद्दल महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा.सुनेत्रा वहिनी पवार यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक व अभिनंदन केले.तसेच हनुमंत पाटील,सुनिलकुमार मुसळे,बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव,तालुका क्रीडा अधिकारी महेश चावला,जिल्हा परिषदेचे सदस्य मंगेश जगताप, बारामती कला क्रीडा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर दिलीप लोंढे व विद्यार्थ्यांना वारंवार सपोर्ट करणारे शितल शहा सराफ यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.बारामती तायक्वांदो अ‍ॅकॅडमीचे अध्यक्ष विशाल माने व बारामती तायक्वांदो क्लबचे अध्यक्ष अजित लोणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अशी माहिती मास्टर दीपक मोरे यांनी दिली.

### ठाण्यात आज मानसिक आरोग्यावर 'मान-सिक' जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन




बारामती (दैनिक संध्या) : धकाधकीच्या जीवनात शरीराच्या आरोग्यासोबतच मनाचे आरोग्य जपणे, ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने ठाणे जिल्हा माहिती कार्यालय आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'मान-सिक' (Man-Sick): जाणिवेतून जागृतीकडे या विशेष सार्वजनिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम उद्या, मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० वाजेपर्यंत, स्थळ: स्व.नरेंद्र बल्लाळ सभागृह, ठाणे महानगरपालिका येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयातील प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल भुसारे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. ते तरुणांमधील मानसिक आरोग्य, त्याबद्दलचे गैरसमज आणि सामाजिक कल्याण या विषयांवर सखोल मार्गदर्शन करतील. 'रेझोनन्स कम्युनिकेशन्स' (Rezonanz Communications) द्वारे राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या 'IEC Bureau' च्या सहकार्याने सुरू आहे. मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक भीती किंवा 'स्टिग्मा' दूर करून तरुणांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे, हा यामागचा मुख्य हेतू आहे. यामध्ये 'सिनेमॅटिक इनिशिएटिव्ह'च्या माध्यमातून लघुपटांद्वारे प्रभावी कथा सांगून प्रेक्षकांमध्ये सहानुभूती आणि जाणीव निर्माण केली जाते. हा उपक्रम भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या (MoHFW) 'Advancing Mental Health Care in India' या राष्ट्रीय ध्येयाला पाठिंबा देणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा माहिती कार्यालय व ठाणे महानगरपालिकेतर्फे करण्यात आले असून, ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, वेसाकइंडिया (VesacIndia) आणि रेझोनन्स कम्युनिकेशन्स यांनी यामध्ये मोलाचे सहकार्य दिले आहे. 'मौन सोडू, संवाद साधू' आणि 'जाणिवेतून जागृतीकडे' वाटचाल करण्यासाठी ठाण्यातील नागरिक, तरुण आणि माध्यम प्रतिनिधींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.




### टाकळी हाजी परिसरातील वीज ग्राहकांना महत्त्वाचे आवाहन

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील महावितरण शाखेकडून वीज ग्राहकांसाठी महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दिनांक 21 मार्च 2026 रोजी टाकळी हाजी येथील विठ्ठल मंदिरात झालेल्या सभेत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असल्याची माहिती शाखा अभियंता नितीन मुरकुटे यांनी दिली. 3 HP व 5 HP क्षमतेच्या शेतीपंपाचे चालू वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र 7.5 HP व त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या शेतीपंपधारकांनी आपले वीज बिल नियमितपणे भरावे,असे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, सध्या सुरू असलेल्या लोडशेडिंगच्या काळात सायंकाळी 6 ते रात्री 10 या वेळेत कोणत्याही परिस्थितीत शेतीपंपाची मोटार सुरू करू नये,असे आवाहन करण्यात आले आहे.जर ग्राहकांनी स्वतःहून त्याकाळात शेतीपंप बंद ठेवले तर यामुळे फीडरवरील वीज भार संतुलित राहून घरगुती ग्राहकांना पुरेशा दाबाने वीजपुरवठा करता येणार आहे.तसेच थकबाकीदार ग्राहकांनी आपले घरगुती,औद्योगिक व वाणिज्य वीज बिल तातडीने भरून महावितरणला सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.महावितरणच्या या निर्णयामुळे वीज व्यवस्थापन सुधारण्यास मदत होणार असून, ग्राहकांनी नियमांचे पालन करावे,असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# पिंगोरी येथे शांती सेनेतील शहीद जवानांना अभिवादन

**२४ मार्च 'शहीद दिन' म्हणून साजरा**

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील पिंगोरी गावात श्रीलंकेत शांती सेनेत कार्यरत असताना वीरगती प्राप्त झालेले शहीद रमेश शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. गावातील माजी सैनिकांच्या हस्ते शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

पिंगोरी हे गाव 'सैनिकांचे गाव' म्हणून ओळखले जाते. याच गावातील रमेश शिंदे हे श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या भारतीय शांती सेनेत सहभागी झाले होते. तमिळ बंडखोरांविरुद्ध लढताना घातपातात झालेल्या हल्ल्यात २४ मार्च १९८९ रोजी त्यांना वीरगती प्राप्त झाली. त्या हल्ल्यात त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनाही प्राणांची आहुती द्यावी लागली होती.



शहीद रमेश शिंदे यांच्या स्मरणार्थ गावात शहीद स्मारक उभारण्यात आले असून, दरवर्षी २४ मार्च हा दिवस 'शहीद दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्रामस्थ एकत्र येत स्मारकासमोर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना अभिवादन करतात. यंदाही मोठ्या श्रद्धेने हा दिवस पाळण्यात आला.

या कार्यक्रमाला पोलीस पाटील राहुल शिंदे, सरपंच संदीप यादव, माजी सरपंच व विद्यमान सदस्य जीवन शिंदे, शहीद रमेश शिंदे यांचे सुपुत्र व ग्रामपंचायत सदस्य प्रकाश शिंदे, तसेच माजी सैनिक राजेंद्र शिंदे, बबन शिंदे, महादेव गायकवाड, अरुण शिंदे, गौतम कांबळे, वसंत शिंदे, राजकुमार शिंदे, सुनील शिंदे, शंकर शिंदे, प्रवीण शिंदे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'मुलेही देशसेवेत'**

शहीद रमेश शिंदे यांच्या कुटुंबीयांनीही देशसेवेची परंपरा पुढे चालू ठेवली आहे. त्यांच्या तीन मुलांपैकी थोरला मुलगा भारतीय सैन्यात कार्यरत असून देशसेवा बजावत आहे. दुसरा मुलगा महाराष्ट्र पोलीस दलात सेवा देत आहे, तर तिसरे पुत्र प्रकाश शिंदे यांनी ग्रामपंचायतीत उपसरपंच म्हणून गावसेवा केली आहे.

यावेळी प्रकाश शिंदे म्हणाले, "वडिलांचे निधन हे दुःखद आहे, पण त्यांनी देशासाठी बलिदान दिले, याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांच्या जाण्यानंतर आईने आमच्या मनात देशप्रेमाची ज्योत कायम पेटती ठेवली."

## कमल वारघडे यांचे निधन; बकोरी परिसरात शोककळा

कोरेगावमुळ (दै. संध्या)

बकोरी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तसेच दत्त कृपा विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या माजी संस्थापक अध्यक्षा कै. श्रीमती कमल गोविंद वारघडे यांचे रविवार, दि. २२ मार्च रोजी सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने बकोरी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून वारघडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



कै. कमल वारघडे या काही दिवसांपासून आजारी होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आयुष्यभर संघर्ष करत आपला संसार उभा केला. रोजगार हमी योजनेवर मजुरी करत त्यांनी आपल्या मुलांचा सांभाळ केला आणि त्यांना चांगले शिक्षण दिले. त्यांच्या जिद्दीमुळे आणि कष्टाळूपणामुळे त्यांनी कुटुंबाला सक्षमपणे उभे करण्याचे मोठे कार्य केले.

पुणे शहरात जन्मलेल्या कमल वारघडे यांनी बकोरीसारख्या ग्रामीण भागात स्थायिक होत कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर यशस्वी आयुष्य घडवले. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि समाजाभिमुख वृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक गुण होते.

त्या दत्त कृपा विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेमार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना संघटित करणे आणि सर्वसामान्य नागरिकांना सक्षम बनवणे यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले.

त्या माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे यांच्या मातोश्री होत. चंद्रकांत वारघडे यांच्या सामाजिक व पर्यावरणीय कार्यामागे आईचे संस्कार आणि प्रेरणा हेच प्रमुख बळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

कै. कमल वारघडे यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने बकोरी परिसराने एक कष्टाळू, जिद्दी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व गमावले असून, त्यांच्या कार्याची छाप कायम समाजाच्या मनात राहणार आहे.

## सुवर्णाताई राक्षे यांच्या माध्यमातून राक्षेवाडीतील सप्ताह यंदा गाजणार

चाकण (दै. संध्या)

ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत, टाळ मृदुंगाच्या गजरात चाकण लगतच्या राक्षेवाडी येथे मोठ्या भक्ती भावाने अखंड हरिनाम सप्ताहास मोठ्या धुमधडाक्यात प्रारंभ झाला आहे. भाविकांच्या भक्तीनामघोषाने अवघी राक्षेवाडी दुमदुमली असून, अवघा परिसर भक्ती रसात चिंब झाला आहे. राक्षेवाडी येथे सुरू झालेल्या या अखंड हरिनाम सोहळ्यातील ज्ञानेश्वरी पूजन युवक नेते ईश्वर राक्षे, बाळासाहेब वाडेकर, रघुनाथ राक्षे, गुलाबराव जाधव, राम राक्षे, बाजीराव राक्षे, हरिभाऊ खोडदे, लक्ष्मण सावंत, श्रीकांत जाधव, किरण कौटकर व कैलास कौटकर आदींच्या हस्ते करण्यात आले. तसेच विणापूजन



चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा श्यामराव राक्षे, नगरसेवक अनिल लोहकरे, माजी नगरसेविका अनिता कौटकर, नारायण राक्षे, नंदाराम जाधव, तुकाराम वाटेकर आदींच्या हस्ते झाले. राक्षेवाडी येथे शनिवार (दि.२८ मार्च) पर्यंत हा सोहळा सुरू राहणार असून सप्ताह कालावधीत पहाटे ४ वाजता श्रींची पूजा व काकड आरती होणार आहे.

## पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पी आय पदी प्रमोद क्षीरसागर यांची नियुक्ती

कवठे येमाई (दै. संध्या)

पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पदी प्रमोद क्षीरसागर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी काल मध्यरात्री १२ वाजता अधिकृतपणे आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे पुणे ग्रामीण भागातील गुन्हेगारीविरोधी कारवाई अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पोलिस दलातील अनुभवी आणि कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळख असलेल्या प्रमोद क्षीरसागर यांनी यापूर्वी शिक्रापूर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून काम करताना उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक गुन्हे उघडकीस करण्यात आलेले असून परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करून पोलीस-जनता संबंध अधिक दृढ करण्यावर त्यांनी भर दिला होता.शिक्रापूर परिसरात वाढत्या गुन्हेगारीवर



नियंत्रण मिळवण्यातही त्यांनी यश संपादन केले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी विविध गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाई करत गुन्हेगारीवर आळा घालण्याचा प्रभावी प्रयत्न केला होता. त्यामुळेच त्यांच्या या नवीन जबाबदारीकडे मोठ्या अपेक्षेने नागरिकांचे लक्ष लागले आहे. पुणे ग्रामीण पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखा ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा मानली जाते. गंभीर स्वरूपाचे गुन्हे उघडकीस आणणे, गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, गुप्त माहितीच्या आधारे छापेमारी करणे आणि विशेष मोहिमा राबविणे या शाखेच्या प्रमुख जबाबदाऱ्या आहेत. अशा संवेदनशील आणि महत्त्वाच्या पदावर प्रमुख पोलिस अधिकारी म्हणून क्षीरसागर यांची नियुक्ती झाल्याने गुन्हेगारीविरोधातील लढ्याला अधिक बळ मिळणार आहे.

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर २६ आदिवासी घरांच्या पायाभरणीचा शुभारंभ

नाझरे सुपे (दै. संध्या)

राजगड तालुक्यातील कादवे येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आदिवासी बांधवांच्या घरांच्या पायाभरणीचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमातून आदिवासी कुटुंबांना पक्के निवासस्थान उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला. राजगड तालुक्यातील एकूण १२३ आदिवासी कुटुंबांपैकी मंजूर झालेल्या २६ कुटुंबांच्या घरांचा पाया भरण्याचा कार्यक्रम गुरुवार, दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मौजे कादवे येथे आयोजित करण्यात




आला होता. या कार्यक्रमास प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे जिल्हा परिषद मा. शालिनीताई कदू, जिल्हा परिषद सदस्य मा. अमोल नलावडे, पंचायत समिती राजगडच्या सभापती मा. सुवर्णाताई राऊत, उपसभापती संदीप खुटवड, सदस्य मा. सीताताई खुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष किरणभाऊ राऊत यांच्यासह गटविकास अधिकारी संजय धमाळ, विस्तार अधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच सामाजिक कार्यकर्ते खंडू गायकवाड आणि कातकरी समाजाचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या योजनेमुळे आदिवासी समाजाच्या राहणीमानात सुधारणा होऊन त्यांना सुरक्षित व सन्मानाचे निवासस्थान मिळणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. "आदिवासी बांधवांना हक्काचे घर मिळणे ही केवळ योजना नसून सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे," असे मत मा. शालिनीताई कदू यांनी व्यक्त केले.

## राणुबाईमळा येथील आई राणूबाई मातेच्या उत्सवाची सांगता

चाकण (दै. संध्या)

चाकण लगतच्या राणुबाईमळा येथे सलग दोन दिवस सुरू असलेल्या आई राणुबाई मातेच्या उत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली. राणूबाई मळ्यात उत्सवाच्या दिवशी सकाळी देवीचा अभिषेक, मांडव टहाळा व सायंकाळी देवीची महाआरती करण्यात आली. त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात देवीचा पालखी सोहळा रंगला होता. या पालखी सोहळ्यात ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अवघा परिसर भक्ती रसात चिंब झाला होता. ग्रामस्थ व तरुण कार्यकर्त्यांनी मातेच्या उत्सवाची यंदा जोरदार तयारी केली होती. महिला, तरुण, तरुणी आदींनी यात्रेचा मनमुराद आनंद लुटला. करमणुकीसाठी शैलेश लोखंडे प्रस्तुत बारा गावच्या बारा अप्सरा हा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या एक गाव बारा भानगडी या नाटकाला नाट्यप्रेमींकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

# चिमणी पोरकी होत चालली आहे

**संभाजी दुधमल, सासवड मो. नं. ७०३८७६५२७१**

पुरंदर (दै. संध्या)

आत्ताच २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस होऊन गेला आहे. २० मार्च हा दिवस दरवर्षी " जागतिक चिमणी दिवस " म्हणून पाळला जातो. हा दिवस चिमण्यांचा संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. पूर्वीच्या काळी पहाटे चिमण्यांच्या किलबिलाटाने दिवसाची सुरुवात व्हायची.

अंगणातील चिमण्यांची चिवचिव मनाला प्रसन्न करायची.

आज शहरी भागात चिऊताई दिसेनाशी झाली आहे. चिमण्यांची कमी झालेली संख्या हे आधुनिक जीवनशैलीचे आणि पर्यावरणाचा समतोल बिघडल्याचे एक गंभीर वास्तव आहे. वाढते शहरीकरण, मोबाईल टॉवर्स आणि कीटकनाशकांचा अतिवापर यामुळे पूर्वी घराघरात दिसणारा चिमण्यांचा चिवचिवाट नाहीसा झाला आहे. त्यांच्या संवर्धनासाठी कृतिम घरटी आणि झाडे लावणे ही काळाची गरज आहे.

आपण आपल्या घराच्या बाल्कनी किंवा झाडावर कृत्रिम घरटे लावू शकतो. उन्हाळ्यात पक्षांसाठी घराच्या छतावर किंवा बाल्कनीत पाण्याची भांडी आणि धान्याचे कण ठेवावेत. चिमण्यांना निवारा मिळण्यासाठी देशी झाडे लावावीत. आपल्या बागेत नैसर्गिक खतांचा वापर करावा. कीटकनाशकांचा अतिवापर टाळावा.चिमण्यांचा चिवचिवाट हे मानवी जीवनाशी निगडित निसर्गाचे एक मंजुळ संगीत आहे. ते पहाटेच्या वेळी वातावरणात स्फूर्ती आणते.

चिमण्या माणसाच्या जवळ अगदी आपल्या घराच्या आसपास राहणे पसंत करतात. त्यासाठी घराच्या अंगणात पुन्हा चिऊताईचा चिवचीवाट ऐकू यावा. यासाठी प्रत्यकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज झालेली आहे. आपल्या अगदी जवळ राहणारा हा चिमणी पक्षी कीटक, धान्य, मध, शिजवलेले अन्न, सूर्यफुलांच्या बिया आणि पिकांवरील कीटक,किडे



खात असते.निसर्गाचा समतोल राखण्यासाठी चिमणी ही जगली पाहिजे आणि तिचे संवर्धन झाले पाहिजे. चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाईल टावर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन,आधुनिक प्रकारचे घरबांधणी, अन्नाची अनुपलब्धता, वाढते प्रदूषण आणि रासायनिक खते व कीटकनाशक यांचा अतिवापर या कारणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे.

चिमणी वाचली तरच आपल्या पुढच्या पिढीला चिमणी बघता येईल. नाही तर " चिऊताई, चिऊताई दार उघड " एवढेच आपल्याला म्हणावे लागेल. त्यासाठी चिमण्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. चिमण्यांचा चिवचिवाट आणि चिमण्यांची किलबिल ऐकण्यासाठी कान कसे आतुर झालेले आहेत. चिमण्यांचा किलबिलाट मनाला प्रसन्न करते." चिमणी, चिमणी ये ग ये, पाणी पी, दाणा खा आणि भुरकून उडून जा " असे आपण लहान बाळाला म्हणतो.कशी गंमत वाटते ना ! मग त्यासाठी आपण सर्वांनी मिळून चिमण्यांचे संवर्धन केले पाहिजे.

दिवसेंदिवस चिमणी आपल्याला पोरकी होत चालली आहे. तिच्या संवर्धनासाठी,तिचा किलबिलाट, तिचा चिवचिवाट ऐकण्यासाठी देशी झाडे लावू, टेरेसला आणि बाल्कनीत पाणी ठेवू, अन्न धान्य ठेवू, बागबगीचा फुलवू, रासायनिक खतांचा वापर टाळू, झाडांवर कृत्रिम घरटे बांधू हाच संकल्प २० मार्चला झालेल्या जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण मिळून करूयात.आणि दरवर्षी येणाऱ्या जागतिक चिमणी दिनाची वाट न बघता आपण दररोजच "चिमणी दिन" साजरा करू. म्हणून या ठिकाणी प्रसिद्ध गीतकार ग. दि. माडगूळकर यांचे गीत येथे आठवते.

|| या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे आपुल्या,जाहल्या तिन्हीसांजा जाहल्या.

## मुलींनी स्वयंप्रकाशित होऊन स्वयंपूर्ण व्हावे – अ‍ॅड. स्नेहा भापकर

बारामती (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ निमित्त "महिलांच्या सुरक्षेसाठी कायदे" या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन डॉ.शरदचंद्रजी पवार कॉलेज ऑफ अ‍ॅग्रिकल्चर व संलग्न महाविद्यालये, बारामती यांच्या वतीने करण्यात आले होते.हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या मंथन हॉल येथे संपन्न झाला.या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून अ‍ॅडव्होकेट स्नेहा भापकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना अ‍ॅडव्होकेट भापकर म्हणाल्या की, भारतात महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत,मात्र केवळ कायदे असणे पुरेसे नसून महिलांनी स्वतः जागरूक होणेही तितकेच आवश्यक आहे.मुलींनी केवळ पदवी घेऊन थांबू नये,तर स्वतः सक्षम व स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न करावा. कामासाठी घराबाहेर पडणारी प्रत्येक महिला सुरक्षित असावी,ही समाजातील प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजात वावरताना आपली नैतिक जबाबदारी काय आहे,याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे,असेही त्यांनी सांगितले.पूर्वी वर्षाला सोडचिठ्ठीच्या सुमारे दहा केसेस येत असत; मात्र सध्या महिन्याला दहा ते बारा केसेस




प्रत्येक वकिलांकडे येत असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच महिलांसोबतच लहान मुलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमाला बारामती सहकारी संस्थेच्या मा.सुरेखा पवार यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा.एस.पी.गायकवाड,प्रा. पी.जी.पाटील मॅडम तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.ए.डी.भोइटे मॅडम, प्राध्यापकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिक्षा कारंडे व सुवर्णा लोखंडे यांनी केले.प्रमुख पाहुण्यांची ओळख दीक्षा सुरवसे यांनी करून दिली,तर समृद्धी गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.सदर कार्यक्रम अ‍ॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन मा.श्री.राजेंद्रदादा पवार, विश्वस्त मा.सौ.सुनंदा पवार व श्री. विष्णुपंत हिंगणे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.निलेश नलावडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिअरफोर्स आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत बीएनसीएचा तिहेरी विजय

मुंबई (दैनिक संध्या) : शिअरफोर्स आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा 2026 या 16, 17 व 18 मार्च दरम्यान व्हीआयटीच्या पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (पीव्हीपीसीओए) यांच्या वतीने आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (बीएनसीए) यांनी उत्कृष्ट कामगिरी करत बास्केटबॉल, व्हॉलीबॉल आणि फुटबॉल या तिन्ही क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. बास्केटबॉल स्पर्धेत बीएनसीए संघाने दणदणीत विजय मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत संघाला रु. 21,000/- इतके पारितोषिक प्रदान करण्यात आले. सई देशपांडे हिने 'टॉप स्कोअरर' म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली, तर रिया देशमुख हिला 'बेस्ट प्लेअर' म्हणून गौरविण्यात आले. व्हॉलीबॉल स्पर्धेतही बीएनसीए संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला असून संघाला रु. 21,000/- इतके पारितोषिक देण्यात आले. फुटबॉल स्पर्धेत बीएनसीए संघाने दमदार खेळ करत विजय मिळवला असून संघाला रु. 12,000/- इतके पारितोषिक मिळाले. तसेच विशाखा शितोळे हिला 'टॉप स्कोअरर' म्हणून सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत बीएनसीएच्या सर्व संघांनी एकत्रितपणे उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. याप्रसंगी बीएनसीएचे प्राचार्य डॉ.अनुराग कश्यप यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि क्रीडा विभाग प्रमुख प्राध्यापक उमेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### लैंगिक अत्याचाराचे आरोप असलेला 'तो' यंदा RCB चा भाग नाही

मुंबई (दैनिक संध्या) : गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला इंडियन प्रीमिअर लीग २०२६ सुरू होण्यापूर्वीच मोठा धक्का बसला. संघातील मॅच विनर गोलंदाज यश दयाल यंदाच्या पर्वात RCB चा भाग नसेल, अशी घोषणा फ्रँचायझीचे संचालक मो बोबट यांनी केली. यश दयालच्या न खेळण्याच्या तपशिलात जाणे बोबाट यांनी टाळले, परंतु त्यांनी या परिस्थितीला "वैयक्तिक बाब" म्हटले. यंदाच्या पर्वात यश दयालच्या माघारीचे वृत्त सांगताना बोबाट यांनी पुनरुच्चार केला की, या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचा फ्रँचायझीसोबतचा करार कायम आहे. "तो एका वैयक्तिक अडचणीतून जात आहे. पण, RCB सोबत त्याचा करार अजूनही कायम आहे," असे बोबाट म्हणाले. जेतेपद कायम राखण्याच्या तयारीत असलेल्या RCB च्या टीम बसच्या पोस्टवरून दयाल याची अनुपस्थिती दिसली आणि अनेक तर्क लावले गेले. फ्रँचायझीने सावध भूमिका घेतली असली तरी, या परिस्थितीचा संबंध क्रिकेटपटूशी संबंधित सुरू असलेल्या कायदेशीर प्रकरणांशी जोडला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गाझियाबादमध्ये दाखल झालेल्या एका प्रकरणात दयालवर लग्नाच्या बहाण्याने लैंगिक शोषणाचे आरोप आहेत. त्या प्रकरणात त्याला अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून अटकेपासून संरक्षण मिळाले आहे. मात्र, जयपूरमध्ये नोंदवलेल्या एका वेगळ्या प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाने लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्यांतर्गत आरोपांचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन त्याला अटकेतून दिलासा देण्यास नकार दिला आहे. सांगानेर सदर पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, अल्पवयीन मुलीने आरोप केला आहे की, जयपूरमधील एका आयपीएल सामन्यादरम्यान ती त्या क्रिकेटपटूच्या संपर्कात आली आणि त्यानंतर दोन वर्षांच्या कालावधीत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार झाले. दुसरे प्रकरण समोर आल्यानंतर, गेल्या वर्षी यूपी ट्वेंटी-२० लीगमध्ये सहभागी होण्यावरही दयालवर बंदी घालण्यात आली होती. २७ वर्षीय खेळाडू आयपीएल २०२४ हंगामापूर्वी ५ कोटी रुपयांना आरसीबीमध्ये सामील झाला होता आणि गेल्या वर्षी १३ बळी घेत त्याने संघाच्या जेतेपदात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

# एसटी महामंडळाच्या राजमाता जिजाऊ बस सेवेचे लोकार्पण

मुंबई (दै. संध्या)




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' या बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली.

विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.

'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे 3 हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास केला. यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

## पुण्यात पायाभूत सुविधांवरील विश्वास वाढला

पुणे (दै. संध्या)

शहरातील सुधारलेल्या पायाभूत सुविधा, स्थिर रोजगाराच्या संधी आणि जलद कर्जप्रक्रिया यामुळे पुण्यातील तरुणांमध्ये घरखरेदीबाबतचा आत्मविश्वास वाढत असल्याचे कोटक महिंद्रा बँकेच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. विशेषतः जनरेशन झेड आणि तरुण मिलेनियल्स आता अपेक्षेपेक्षा लवकर गृहखरेदीचे निर्णय घेत असल्याचे चित्र दिसत आहे.कोटक महिंद्रा बँकेचे गृहनिर्माण वित्त विभागाचे व्यवसाय प्रमुख मनू सिंग यांनी सांगितले की, देशभरात कमी वयात घर खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. "आमच्या गृहकर्ज घेणाऱ्यांचे सरासरी वय आता ३२ वर्षांवर आले आहे, जे पाच वर्षांपूर्वी सुमारे ३६ वर्षे होते. तरुण ग्राहक आता त्यांच्या गरजांबाबत अधिक स्पष्ट आणि ठाम आहेत," असे त्यांनी नमूद केले.

■ जनरेशन झेडकडून घरखरेदीचे निर्णय जलद – कोटक

## कल्चर सर्कल ब्रॉडवे पुण्यात दाखल झाल्याने रिटेल विस्ताराला नवी चालना मिळाली

पुणे (दै. संध्या)




आशियातील आघाडीचा हायप आणि लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्म 'कल्चर सर्कल'ने पुण्यात आपल्या नव्या फ्लॅगशिप स्टोअरचे उद्घाटन केले आहे. कोपा मॉलमधील ब्रॉडवे येथे २१ मार्च २०२६ रोजी या स्टोअरचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. शहरातील प्रीमियम लाइफस्टाइल आणि रिटेल हबमध्ये उघडलेले हे स्टोअर कंपनीच्या ऑफलाइन विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हे स्टोअर संपूर्ण लक्झरी अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले असून, येथे प्रमाणित प्रीमियम स्नीकर्स, लक्झरी हँडबॅग्स, उच्च दर्जाच्या घड्याळांचा तसेच लोकप्रिय स्ट्रीटवेअरचा समावेश आहे. एर्मेस, लुई वितों, शॅनेल आणि डिओर यांसारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबत एअर जॉर्डन, यीजी, नायकी डंक आणि न्यू बॅलन्स यांसारखे स्नीकर्स पर्याय ग्राहकांना उपलब्ध आहेत. स्टोअरमधील प्रत्येक उत्पादन कंपनीच्या विशेष ऑथेंटिकेशन प्रणालीद्वारे तपासले जाते. 'चेकचेक'सोबतच्या भागीदारीमुळे ग्राहकांना १०० टक्के अस्सल उत्पादनांची खात्री मिळते. यापूर्वी दिल्ली आणि हैदराबादमध्ये यशस्वी स्टोअर्स सुरू केल्यानंतर, कंपनी आता मुंबईतील बांद्रा येथे नवीन स्टोअर उघडण्याच्या तयारीत आहे. भारतातील लक्झरी रिटेल क्षेत्रात विश्वास आणि आधुनिक अनुभव निर्माण करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## पुणे लष्कर परिसरातील राम मंदिराचा जीर्णोद्धार काम अंतिम टप्प्यात

उरण (दै. संध्या)



लष्कर भागातील नामदेव शिंपी समाजातील बांधवांनी सुमारे १३० वर्षांपूर्वी साकारलेल्या श्रीरामाच्या मंदिरातील सभामंडपाला आता नवा साज चढत आहे. मंदिराच्या जीर्णोद्धाराचे हाती घेतलेले काम अंतिम टप्प्यात आले असून, येत्या श्रीराम नवमीचा उत्सव नवे रूप लाभलेल्या मंदिरामध्ये साजरा होणार आहे. ऐन वर्दळीच्या महात्मा गांधी रस्त्यालगतचे हे श्रीराम मंदिर आजही लष्कर भागातील एकमेव श्रीराम मंदिर म्हणून ओळखले जाते. ब्रिटिशांचा पुण्यातील तळ लष्कर भागामध्ये होता. कपडे शिवण्यासाठी ते शहरातील शिंपी समाजावर अवलंबून होते. यातूनच सुमारे दोनशे वर्षांपूर्वी महात्मा गांधी रस्त्यालगतच्या परिसरात नामदेव शिंपी समाजाची कुटुंबे राहायला आली. या समाजातील ज्येष्ठांनी श्रीराम मंदिर उभारण्यात पुढाकार घेतला. समाजबांधवांच्या वर्गणीतून १८९१मध्ये '२७९-८०' महात्मा गांधी रस्त्यावर प्रशस्त वास्तू खरेदी केली. विशेष म्हणजे या वास्तूमध्ये आधीपासून राम मंदिर होते. मंदिरात श्रीराम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान अशा पाषाणाच्या मूर्ती होत्या. लगतची इमारत मोडकळीस आली होती. त्यामुळे इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. एकत्रित प्रयत्नातून १६ मार्च १९१५ या दिवशी खानबहादुर ए. एम. दस्तूर यांच्या हस्ते नवीन मंदिराचे उद्घाटन झाले. यानंतर आता जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले असून, यामुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलले आहे. सभामंडपातील लाकडी काम ॲड. अनिल हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. लाकडात असून, सभामंडपाची उंची सुमारे ३० फूट उंच आहे. या प्रकारचे सभामंडप पुण्यात फार कमी आहेत. सध्या याचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. त्याअंतर्गत सर्व लाकडांचा जुना रंग काढून आता नवे पॉलिश चढविण्यात येत आहे, हे काम आता पूर्णत्वास आले असून, सभामंडपात नक्षीकाम केलेले लाकडी खांब सभामंडपात लावण्यात आले आहेत,' अशी माहिती ॲड. अनिल हिरवे यांनी दिली. २०२५ श्रीराम नवमी नंतर जीर्णोद्धाराच्या कामाला सुरुवात झाली. यामध्ये समाज बांधव व श्रीराम भक्तांनाच्या लोकवर्गणीतून सन १९१५ नंतर आता पहिल्यांदाच मंदिराचा जीर्णोद्धार होत आहे.

## वाघांच्या अनैसर्गिक मृत्यूंवर स्पष्टीकरण सादर करा..!

नागपूर (दै. संध्या)

मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने राज्य सरकारला नोटीस जारी करून वाघांच्या अनैसर्गिक मृत्यूंवर येत्या २३ एप्रिलपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्याचा आदेश दिला आहे. प्रकरणातर न्यायमूर्तीद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यासमक्ष सुनावणी झाली. राज्यामध्ये वाघांचे मृत्यू वाढले आहेत. न्यायालयाने यावर आवश्यक उपाययोजना करण्यासाठी स्वतःच जनहित याचिका दाखल केली आहे. यावर्षी १२ जानेवारीपर्यंत चार वाघ मृत्युमुखी पडले. गेल्यावर्षीच्या जानेवारीत देखील ११ वाघांचा मृत्यू झाला होता. मानव-वन्यजीव संघर्ष सतत वाढत आहे. एकीकडे वाघ माणसांची शिकार करीत असून, दुसरीकडे माणसे स्वतःच्या रक्षणासाठी वाघांचा जीव घेत आहेत. ३१ डिसेंबर २०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील सेलू मुरपाड येथे वाघिणीच्या मृत्यूची घटना उघडकीस आली. त्या प्रकरणात अद्याप कोणालाच अटक झाली नाही. ७ जानेवारी रोजी पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत देवलापार परिसरात वाघाच्या दोन बछड्यांचा मृत्यू झाला, तर ११ जानेवारीला चंद्रपूर वनविभागातील चिंचोली गावाजवळच्या इरई नदीपात्रात सुमारे दोन वर्षांची वाघीण मृतावस्थेत आढळली होती.

# 'पल्स' वैद्यकीय परिषदेमुळे आरोग्यव्यस्थेचा पाया अधिक बळकट : मंत्री हसन मुश्रीफ

पल्स वैद्यकीय परिषदेच्या माध्यमातून आरोग्य व वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील नवोन्मेष, संशोधन पुढे येईल. या क्षेत्रात नवनवीन संकल्पना, कार्य करणाऱ्या स्टार्टअप्सलाही परिषदेत व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. जगभरातून उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक परिषदेत येणार आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्यवस्थेचा पाया अधिक बळकट करणे शक्य होणार आहे.



शब्दांकन दत्तात्रय कोकरे, विभागीय संपर्क अधिकारी

माझा युवा डॉक्टर आणि संशोधकांना एकच संदेश आहे "फक्त पदवी मिळवणारे डॉक्टर न होता, परिवर्तन घडवणारे डॉक्टर बना." आज वैद्यकीय क्षेत्र अतिशय वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पना यांना स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आपल्या ज्ञानासोबत संवेदनशीलता, सामाजिक जाणीव आणि सतत शिकण्याची वृत्ती ठेवली तर आपण केवळ चांगले डॉक्टरच नव्हे, तर समाजाचे खरे आरोग्यदूत बनू शकता, महाराष्ट्र शासन तुमच्या संशोधनाला, स्टार्टअप कल्पनांना आणि जागतिक संधींना नेहमी पाठिंबा देण्यासाठी कटिबद्ध आहे.या परिषदेचा महाराष्ट्राच्या सामान्य नागरिकांना थेट आणि दीर्घकालीन फायदा होणार आहे. अधिक दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिनमुळे गावागावात तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला सहज मिळेल. औषधनिर्मिती आणि वैद्यकीय क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, वेलनेस आणि मेडिकल पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. आरोग्यविषयक जनजागृती वाढल्याने लोक अधिक सजग आणि निरोगी जीवनशैलीकडे वळतील. 'पल्स' परिषद ही केवळ तज्ज्ञांची किंवा उद्योगांची परिषद नसून महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्य, रोजगार आणि भविष्याशी थेट जोडलेली एक सकारात्मक चळवळ आहे. एका मोठ्या प्रवासाची सुरुवात आहे जिथे महाराष्ट्र आरोग्य, शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या बळावर देशात आणि जगात एक आदर्श राज्य म्हणून उभे राहील.

भविष्यातील वैद्यकीय शिक्षण हे केवळ पुस्तकांपुरते मर्यादित राहणार नाही, तर तंत्रज्ञानाधारित, संशोधनकेंद्रित आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असणे अत्यावश्यक आहे. आज आरोग्य क्षेत्र झपाट्याने बदलत आहे, त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना केवळ पदवी नव्हे, तर जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता देणे ही काळाची गरज आहे. यासाठी काही महत्त्वाचे बदल आवश्यक आहेत. डिजिटल आणि सिम्युलेशन-आधारित शिक्षण, व्हर्चुअल लॅब्स, थ्री-डी ॲनाटॉमी, सर्जिकल सिम्युलेटर यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळेल. एआय आणि डेटा ॲनालिटिक्सचा समावेश, रोग निदान, रोग नियंत्रण आणि संशोधनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता समजणे अत्यंत गरजेचे ठरेल. संशोधन संस्कृतीला प्रोत्साहन, वैद्यकीय महाविद्यालयात रिसर्च लॅब्स, स्टार्टअप कक्ष आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी वाढवणे. ग्रामीण व समुदायाधारित प्रशिक्षण, विद्यार्थ्यांनी गावपातळीवर आरोग्यसेवा समजून घेतल्यास त्यांची सामाजिक जाणीव वाढेल. आंतरराष्ट्रीय सहकार्य व एक्सचेंज प्रोग्राम, परदेशी विद्यापीठांशी भागीदारी करून जागतिक दर्जाचे शिक्षण अनुभवण्याची संधी. मल्टिडिसिप्लिनरी दृष्टिकोन, वैद्यकीय शिक्षणासोबत व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि संवाद कौशल्यांचा समावेश. थोडक्यात, भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून तंत्रज्ञान जाणणारे, संशोधनप्रिय आणि समाजाभिमुख आरोग्यदूत असावेत, हा राज्य शासनाचा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्र याच दिशेने वैद्यकीय शिक्षणात बदल घडवून आणत आहे.

**डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स :** कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय वैद्यकीय क्षेत्रात खऱ्या अर्थाने क्रांती घडवू शकते, कारण ती डॉक्टरांच्या कौशल्याला पूरक ठरते. एआयमुळे आजारांचे लवकर आणि अधिक अचूक निदान, एक्स-रे, एमआरआय, सीटी-स्कॅन यासारख्या तपासण्यांचे जलद विश्लेषण आणि उपचाराची योग्य दिशा ठरवणे शक्य होत आहे. त्यामुळे रुग्णाचा वेळ वाचतो, चुका कमी होतात आणि उपचार अधिक परिणामकारक होतात. भविष्यात एआय आधारित रोबोटिक सर्जरी, वैयक्तिकृत उपचार योजना आणि रोगाचा पूर्वानुमान हे मोठे बदल घडवतील. डिजिटल हेल्थ आणि डेटा ॲनालिटिक्स यांचे महत्त्वही तितकेच मोठे आहे. डिजिटल नोंदी, ई-हॉस्पिटल प्रणाली, ऑनलाईन रिपोर्ट्स आणि मोबाईल हेल्थ ॲप्स यामुळे आरोग्यसेवा अधिक पारदर्शक आणि सुलभ होते. डेटा ॲनालिटिक्समुळे राज्य शासनाला रोगांचे ट्रेंड, लसीकरणाची गरज, संसर्गाचा प्रसार आणि आरोग्य धोरणांची दिशा अचूकपणे समजते. म्हणजेच, निर्णय हे अंदाजावर नव्हे तर अचूक माहितीवर आधारित घेतले जातात.

**आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्य :** आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत सहकार्याची शक्यता अत्यंत सकारात्मक आणि व्यापक आहे. एक्सचेंज प्रोग्राम, संयुक्त संशोधन प्रकल्प, ऑनलाईन अभ्यासक्रम आणि प्राध्यापक-विद्यार्थी देवाणघेवाण यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे ज्ञान आणि अनुभव मिळेल. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांना यामुळे आंतरराष्ट्रीय ओळख मिळेल आणि आपल्या डॉक्टरांना जगभरात स्पर्धा करण्याची ताकद प्राप्त होईल. थोडक्यात, एआय, डिजिटल हेल्थ आणि जागतिक सहकार्य यांची सांगड घातली तर महाराष्ट्राचे आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्र आधुनिक, अचूक आणि जागतिक दर्जाचे बनू शकते.

संशोधनाला चालना देणे ही राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण नवीन औषधे, आधुनिक उपचार पद्धती आणि तंत्रज्ञानाची प्रगती ही संशोधनातूनच घडते. यासाठी राज्य शासनाकडून वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधन प्रयोगशाळा बळकट करणे,

विशेष संशोधन अनुदाने देणे, बायो-डेटा व क्लिनिकल स्टडीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्योग-संशोधन संस्था-शासकीय विभाग यांच्यात सहकार्य वाढवणे अशी ठोस पावले उचलली जात आहेत.

तसेच पेटंट प्रक्रियेसाठी आर्थिक व तांत्रिक मदत, आंतरराष्ट्रीय जर्नल्सशी जोडणी आणि संयुक्त संशोधन प्रकल्प यांना प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून राज्यातील संशोधन जागतिक स्तरावर पोहोचेल.

**"चर्चेपासून कृतीकडे" नेणारी परिषद :** वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पल्स' परिषद ही एक मोठी संधी आणि प्रेरणादायी व्यासपीठ ठरेल. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना-देश-विदेशातील तज्ज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन ऐकण्याची संधी, नवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल हेल्थ यांचा प्रत्यक्ष अनुभव, संशोधन पोस्टर सादरीकरण, पेपर प्रेझेंटेशन आणि स्पर्धांमध्ये सहभाग घेणे, इंटर्नशिप, फेलोशिप आणि करिअर नेटवर्किंगच्या संधी आणि स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रातील मार्गदर्शन म्हणजेच ही परिषद विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणार नाही, तर आत्मविश्वास, दृष्टी आणि जागतिक स्तरावर पुढे जाण्याची प्रेरणा देईल. भविष्यातील डॉक्टर केवळ उपचार करणारे नसून संशोधनप्रिय आणि तंत्रज्ञानसज्ज असावेत, यासाठी ही परिषद महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

थोडक्यात, 'पल्स' परिषद ही "चर्चेपासून कृतीकडे" नेणारी परिषद असेल जिथे निष्कर्ष थेट धोरणात आणि धोरण थेट जनतेच्या हिताच्या उपक्रमात रूपांतरित होईल. 'पल्स' परिषदेचा व्यापक दृष्टीकोन हा केवळ एका वर्षाचा किंवा एका प्रकल्पाचा नाही, तर पुढील काही वर्षांचा आरोग्य रोडमॅप ठरवण्याचा आहे. आम्ही महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्राला असे पाहतो की जिथे प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळेल मग तो शहरात राहो किंवा दुर्गम गावात.

**महाराष्ट्र : आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन :** पुढील दशकात आमची स्पष्ट दिशा अशी आहे की, महाराष्ट्राला डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य व्यवस्थेत देशात अग्रस्थानी नेणे, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनात राज्याला जागतिक दर्जाचे केंद्र बनवणे, ग्रामीण व आदिवासी भागात मजबूत प्राथमिक आरोग्य सुविधा उभ्या करून आरोग्यसेवेतील असमानता कमी करणे, मेडिकल आणि वेलनेस पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय हेल्थ डेस्टिनेशन म्हणून ओळख मिळवून देणे. स्टार्टअप्स, मेडटेक आणि बायोटेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती घडवून आणणे. या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक बनवणे. 'पल्स' परिषद म्हणजे या प्रवासाची सुरुवात आहे, जिथून पुढील दहा वर्षांसाठी ठोस दिशा आणि आत्मविश्वास मिळेल.

जागतिक आरोग्य संघटनांचा सहभाग हा महाराष्ट्रासाठी आणि आपल्या देशासाठी विश्वास, पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय मान्यता यांचा स्पष्ट संदेश देणारा आहे. जेव्हा अशा नामांकित संस्था आपल्या परिषदेचा भाग होतात, तेव्हा जगाला हे दिसून येते की महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात गंभीरपणे आणि दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून काम करत आहे. यामुळे दोन महत्त्वाचे संदेश जातात. पहिला म्हणजे आपली आरोग्य व्यवस्था जागतिक दर्जाची बनवण्याचा आपला निर्धार ठाम आहे. दुसरा म्हणजे- ज्ञान, संशोधन आणि सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्यासाठी आपण तयार आहोत.

**महाराष्ट्र: भारताचा हेल्थ गेटवे :** भारताला आरोग्य क्षेत्रात "ग्लोबल हब" बनवण्याच्या प्रवासात महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि नेतृत्व करणारी असेल. आपल्या राज्यात आधीपासूनच जागतिक दर्जाची रुग्णालये, कुशल डॉक्टर, मजबूत वैद्यकीय शिक्षण व्यवस्था, औषधनिर्मिती उद्योग, प्रगत तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, नागपूरसारखी शहरे आधीच आरोग्यसेवा, संशोधन आणि मेडिकल टूरिझमची मोठी केंद्रे बनली आहेत. 'पल्स' परिषदेच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूक, संशोधन सहकार्य, स्टार्टअप इकोसिस्टीम आणि वेलनेस पर्यटन या सर्व घटकांना एकत्र आणत आहोत. यामुळे महाराष्ट्र केवळ राज्यापुरता मर्यादित न राहता भारताचा हेल्थ गेटवे म्हणून उभा राहू शकतो. जिथे जगभरातून रुग्ण उपचारासाठी, विद्यार्थी शिक्षणासाठी आणि उद्योग गुंतवणुकीसाठी येतील.

# विद्युत रोहित्र चोरी करणारी आंतरजातीय टोळी जेरबंद



नारायणगाव (दै. संध्या)

स्थानिक गुन्हे शाखेने विद्युत रोहित्र चोरी करणारी आंतरजातीय टोळी जेरबंद करून 23 गुन्हे उघडकीस आणले असून 137 किलोग्रॅम वजनाच्या तांब्याच्या तारा व गुन्ह्यात वापरलेली वाहने जप्त करून 8 लाख 92 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पुणे ग्रामीण जिल्ह्यात विद्युत रोहित्र चोरीचे प्रमाण वाढले होते. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना केल्या होत्या.त्यानुसार जुन्नर, खेड उपविभागात कामकाज पाहणाऱ्या अधिकारी अंमलदार यांच्या तपास पथकास नियुक्त करून तपास पथकाने गुन्ह्यांची घटनास्थळे तपासून त्या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या रोडवरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता सदरचे गुन्हे हे रेकॉर्डवरील आरोपी यांनी केले असून रोहित्र चोरी करणारी टोळी तळेगाव ढमढेरे परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने तपास पथकांनी सापळा रचून भास्कर रंगनाथ केवळ (वय 34 वर्ष रा.पिराचीवाडी निमदरी ता.जुन्नर, जि.पुणे ), कृष्णा बबन जाधव (वय 30 वर्ष रा.मिडगुलवाडी कान्हूर मेसाई, ता.शिरूर,जि. पुणे), दिपक लहू भालेकर (वय 30 वर्ष ) राजेंद्र भालचंद्र भालेकर (वय 33 वर्ष दोघेही रा. ढगाडवाडी येणेरे,ता. जुन्नर जि. पुणे ), सुखरूप सुखदेव नांगरे (वय 24 वर्ष रा.हिवरे तर्फे नारायणगाव ता.जुन्नर, जि.पुणे) या पाचही आरोपींना 17 मार्च 2026 रोजी मांजरवाडी रोड,पुणे- नाशिक बायपासजवळ सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे अधिकची चौकशी केली असता त्यांनी पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी विद्युत रोहित्र चोरी केल्याचे सांगितले. तपासादरम्यान गुन्हा करण्यासाठी वापरलेली इर्टिगा कार, अल्टो कार अशी दोन चारचाकी वाहने,चोरी केलेल्या 137 किलोग्रॅम वजनाच्या तांब्याच्या तारा असा एकूण आठ लाख 92 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून त्यांच्याकडून 23 गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींवर अहिल्यानगर पुणे ग्रामीण जिल्ह्यात यापूर्वी विद्युत रोहित्र चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, पुणे विभागाचे अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील, खेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,पोलीस अंमलदार दीपक साबळे, संदीप वारे,अक्षय नवले, विक्रमसिंह तापकीर, हेमंत विरोळे, निलेश सुपेकर,राजू मोमीन, महिला पोलीस हवालदार सुजाता कदम, यांनी केली असून आरोपी सध्या पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असून पुढील तपास नारायणगाव पोलीस स्टेशन करत आहे.

# भीषण अपघातात पती पत्नीसह सासूचा मृत्यू

नारायणगाव (दै. संध्या)



पुणे नाशिक महामार्गावर मंचर जवळील एकलहरे गावच्या हद्दीत रविवार दि. 22 रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास नाशिकहून पुण्याकडे जाणाऱ्या कारचा व पुण्याकडून नाशिकच्या बाजूला जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील पती-पत्नी आणि सासू अशा तिघांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन मुले गंभीर जखमी झाली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मल्लिकार्जुन शिवराज आंबेगावे (रा. पिंपरी पुणे) हे आपल्या कुटुंबासह नाशिकहून पुण्याकडे कारने येत होते. त्यावेळी पुणे नाशिक महामार्गावर एकलहरे गावच्या हद्दीत इंद्रप्रस्थ पेट्रोल पंपाजवळ त्या कारच्या चालकाचा ताबा सुटल्याने ती दुभाजक तोडून समोरून येणाऱ्या बसला धडकली. या भीषण धडकेत चालक मल्लिकार्जुन आंबेगावे (वय 42) त्यांची पत्नी आरती आंबेगावे (वय 40)आणि सासु लता तुपलोंढे (वय 60) यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात मुलगा प्रेम आंबेगावे (वय 20) आणि मुलगी मृणाल आंबेगावे (वय 16) ही दोन्ही मुले जखमी झाली असून त्यांच्यावर मंचर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघात इतका भीषण होता की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून दोन्ही टायर फुटले. बसच्या पुढील बाजूच्या भागाचे नुकसान झाले आहे. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी मागून आलेल्या वाहनाने हूल दिल्याने किंवा टायर फुटल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंचर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून अपघाताला कारणीभूत तसेच स्वतःच्या मृत्यूस आणि इतरांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या कारणावरून कार चालक मल्लिकार्जुन आंबेगावे यांच्यावर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बस चालक राजू चत्रू राठोड (वय 38 रा.उजळता ता.शहादा, जि.नंदुरबार) यांच्या फिर्यादीनुसार मंचर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. मृतदेहांचे शवविच्छेदन करून ते नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महान क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना शहिद दिनी विनम्र अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या शहीद दिनानिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सेवादल अध्यक्ष लतेंद्र भिंगारे, सचिन सावंत, गाडेकर मनोहर, नागरे सुरेश, वैभव डांगमाळी, आकाश ढवळे, दिलीप लोळगे, नरेश आवटे, पोपट पाटोळे आदी उपस्थित होते.



### आळंदीत राम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

आळंदी (दैनिक संध्या) : श्री राम जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील आवेकर-भावे रामचंद्र संस्थान ट्रस्टच्या राम मंदिरात दि.१९ मार्च ते २६ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत वेद पाठशाळा आळंदी यांच्या मार्फत रुद्र अभिषेकाचे मंत्रपठण करण्यात येत आहे. यासोबतच विविध कलाविष्कारांनी राम मंदिराचा परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला आहे. कार्यक्रमांतर्गत भरतनाट्यम नृत्य सादरीकरण डॉ.परिमल फडके यांच्या परिमल परफॉर्मिंग आर्ट अँड रिसर्च सेंटरच्या विद्यार्थ्यांनी केले. तसेच पं. रमाकांत पराजपे यांचे वाद्य संगीत, ज्ञानेश्वरीताई रोकडे महाराज, रामकृष्ण गरड महाराज व मुक्ता कुलकर्णी गरसोळ यांची अभंग वाणी, सई देशपांडे यांची रामलीला, नितीन आवेकर यांचा रामनाम गजर, संजय भावे यांचे सेक्सोफोन वादन, सौ. अर्पणा केळकर यांचे अभंग सादरीकरण असे विविध कार्यक्रम रंगले. याशिवाय अमिता घुगरी व तुषार रिठे यांचे भक्ती संगीत, हेमंत आठवले यांचे भजन, अमित खरे यांचे बासरी वादन, ज्योती गोराणे यांचे अभंग-भक्तीगीत, आबा महाराज गोडसे यांचे वारकरी भजन तसेच विद्या इंगळे व रमा चोभे यांचे शास्त्रीय वायलिन वादन अशा विविध सादरीकरणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सर्व कलाकारांचा सत्कार संस्थानचे मुख्य विश्वस्त राहुल आवेकर तसेच विश्वस्त अविनाश गुळुंजकर, अर्जुन मेदनकर, लक्ष्मीकांत दंडनाईक, चिन्मय चोभे, रमेश मुसुडगे व माजी विश्वस्त यांच्या हस्ते करण्यात आला. राम नवमीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

### डोर्लेवाडीच्या उपसरपंचपदी राहुल भोपळे बिनविरोध

डोर्लेवाडी (दैनिक संध्या) : डोर्लेवाडी (ता. बारामती) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राहुल सुरेश भोपळे यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच सुनील मारुती म्हेत्रे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त पदासाठी मंगळवारी (ता. २४) सरपंच तथा अध्यासी अधिकारी सुप्रिया मनोज नाळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवडीसाठी सभा घेण्यात आली. यावेळी उपसरपंचपदासाठी राहुल भोपळे, प्रशांत जाधव, रेखा नाळे, विद्या काळकुटे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, माघार घेण्याच्या वेळेत प्रशांत जाधव, रेखा नाळे, विद्या काळकुटे यांनी अर्ज मागे घेतल्याने भोपळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे नाळे व ग्रामपंचायत अधिकारी सुनील माने यांनी जाहीर केले. यावेळी सुनील म्हेत्रे, विश्वजीत घोडे, सुमित्रा वामन, राणी नेवसे, छबूबाई मदने, विद्या काळकुटे, रेखा नाळे आदी उपस्थित होते.

# कक्कय्या समाज : मोफत वधू-वर परिचय मेळावा संपन्न!

पुणे (दै. संध्या)



कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या वतीने सायन येथील डि. एस हायस्कूल मध्ये मोफत वधू -वर परिचय मेळावा दिनांक २१ मार्च २०२६ रोजी आयोजित केला होता.यावेळी सौ अर्चनाताई शिंदे (नगरसेविका), श्री ना. म शिंदे (जेष्ठ साहित्यिक), शिवलिंग व्हटकर (अध्यक्ष संत कक्कय्या समाज विकास संस्था धारावी), राम कोकणे (अध्यक्ष समस्त कक्कय्या समाज महासंघ मुंबई ), महादेव शिंदे (अध्यक्ष वीर शैव कक्कय्या कल्याण मंडळ ),सौ. कांता तपासे (अध्यक्ष डोंबिवली मंडळ), अशोक पाटेकर (सचिव वीर शैव कल्याण समाज मंडळ वेरूळ), संदीप कळंबे (निवृत्त उपजिल्हाअधिकारी मुंबई), शशिकांत सोनवणे(प्रवक्ता समस्त कक्कय्या समाज महासंघ )यांच्या उपस्थित हा वधू -वर परिचय मेळावा उदंड प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. वधू -वरांना एकाच व्यासपीठावर आणून त्याच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती मिळते.शिवाय लग्न जुळवतना वधू आणि वरांच्या घरच्या मंडळींना वधू वरांच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती अगोदरच कळल्यामुळे कुठलीच अडचण निर्माण होत नाही.

भावी वधूवर निवडतांना जास्त अपेक्षा करणे व्यर्थ. त्यापेक्षा माणसं कशी आहेत, हेच पाहणे महत्त्वाचे. वाढत्या कौटुंबिक गरजा, त्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने ताणतणाव कौटुंबिक दुराव्यामुळे वधूवर पालक परिचय मेळावा ठिकठिकाणी आयोजित होणे आता आवश्यक बाब बनली आहे. त्यामुळे कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी पुढाकार घेऊन संत कक्कय्या समाजाचा वधू-वर परिचय मेळावा यशस्वीरित्या पार पाडला. यावेळी ३००हून अधिक नवोदित वधू वरांनी आपली नाव नोंदणी करुन आपला परिचय दिला.

कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी आयोजित केलेल्या या वधू वर परिचय मेळाव्यासाठी मुख्य मार्गदर्शक विजय पोळ,कार्याध्यक्ष मनोहर सोनवणे,अध्यक्ष हेमंत व्हटकर, सचिव मसाजी होटकर,उपाध्यक्ष गिरीराज शेरखाने, उप सचिव मंगेश खरटमल,अ. हि.तपासणीस परशुराम खंदारे,उपाध्यक्ष विश्वनाथ शिंदे,उपाध्यक्ष किरण व्हटकर, खजिनदार विजय शिंदे उपखजिनदार बाबुराव कावळे,वित्तीय सल्लगार सुनिल पोळ, तसेच मंडळाचे सदस्य गौतम व्हटकर, मछिंद्र कदम, वामन पोळ, सुनिल व्हटकर,गंगा जोगधनकर, सुनिता सोनटक्के,माधुरी गायकवाड, सुरेखा व्हटकर, अनुष्का शिंदे, संगिता होटकर, लक्ष्मी पोळ,प्रमिला सोनावणे इत्यादी सभासदांनी विशेष मेहनत घेऊन वधू वर परिचय मेळावा पार पाडला. यावेळी समाजातील विविध मान्यवर मंडळींनी उपस्थित राहून कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या कार्याचा गौरव केला.

*कै. पै. बाबासाहेब मोकर स्मरणार्थ २८ वी राज्यस्तरीय*

# सायकल स्पर्धा उत्साहात संपन्न

कोरेगावमुळ (दै. संध्या)

कै. पै. बाबासाहेब श्रीहरी मोकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेली २८ वी राज्यस्तरीय सायकल स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ पुणे जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने बाल तरुण मंडळ येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन मंदार बलकवडे, मोकर सर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सातपुते आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ४५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदवत स्पर्धेची रंगत वाढवली.

स्पर्धेदरम्यान विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शंकर केमसे, पुनीत जोशी, सुधाकर मेमाणे, सुनील आप्पा मोकर, संजय मरळ, आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, हर्षल निकम, शफिक शेख, प्रकाश चुनेकर, मयूर कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील निकाल पुढीलप्रमाणे :

प्रथम क्रमांक : रवींद्र पाटील (कोल्हापूर)
द्वितीय क्रमांक : वीरेंद्र पाटील
तृतीय क्रमांक : हरीश डोंबाळे
चतुर्थ क्रमांक : ओंकार खेडेकर
पंचम क्रमांक : केशव मोरे
षष्ठ क्रमांक : सुमित गुजर

या स्पर्धेचे तांत्रिक संचालन राष्ट्रीय खेळाडू व मार्गदर्शक बिरु भोजने यांनी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या प्रतिनिधी म्हणून पाहिले. स्पर्धेचे संपूर्ण नियोजन आणि आयोजन आकाश दादा मोकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने पार पाडले.

या स्पर्धेमुळे सायकलिंग खेळाला चालना मिळाली असून, युवा खेळाडूंना आपली कौशल्ये दाखवण्याची मोठी संधी मिळाल्याचे मान्यवरांनी सांगितले.

## मांजरी-आव्हाळेवाडी-कोलवडी रस्त्यांची दैना

पुणे (दै. संध्या)

मांजरी खुर्द येथील मांजरी वाघोली व कोलवडी या मुख्य रस्त्यांसह परिसरातील रस्त्यांची दैन्यावस्था झाली असून पडलेले खड्डे, उडणारी धूळ आणि रखडलेल्या कामांमधून मार्ग काढताना प्रवाशांना मोठ्या प्रमाणात यातना भोगाव्या लागत आहेत. गेली अनेक वर्षांपासून ही परिस्थिती असतानाही रस्ते विकास प्रशासनासह येथील लोकप्रतिनिधीही सूस्त का आहेत, असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. परिसरातील मांजरी खुर्द- आव्हाळेवाडी पुढे वाघोली, मांजरी खुर्द - कोलवडी, पवार वस्ती ते माहेर संस्था रस्ता, बाएफ रस्ता, आव्हाळेवाडी - केसनंद-कोलवडी रस्ता, वडजाई, डोमखेल आदी रस्त्यांची मोठ्याप्रमाणावर दुरावस्था झाली आहे. दीड-दोन फुटांचे खड्डे, उखडलेली खडी, अनेक महिन्यांपासून रखडलेली अर्धवट कामे, कॉक्रीटमधून उघड्या पडलेल्या सळ्या, वारंवार तुटणारे चेंबर, खचलेल्या साईड पट्ट्या, अशा रस्त्यांवरून होणारी मिक्सर व डंपर सारख्या राक्षसी वाहनांची बेदरकार वाहतूक, निकृष्ट दर्जाचे काम आणि त्यातून उठणारे धुळीचे लोट तसेच सुरक्षा साधनांची कमतरता यामुळे या सर्वच रस्त्यांवरील सामान्य प्रवासी मेटाकुटीला आला आहे. पवार वस्ती ते माहेर संस्था या रस्त्यावरील काँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे झाले आहे ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात रस्त्याला तडे गेलेले आहेत रस्ता ओलांडण्यासाठी वाहिन्या टाकण्यात आलेल्या नाहीत साईड पट्ट्या भरलेल्या नाहीत काही ठिकाणी रस्ता उघडल्याचे लक्षात आल्यानंतर त्या ठिकाणी दुसरा अतिरिक्त थर देण्यात आला आहे. हे सर्वच काम निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार येथील नागरिकांनी व प्रवाशांनी केली आहे.

# शहीद जवानांना अभिवादन : २४ मार्च 'शहीद दिन' म्हणून साजरा

वाल्हे (दै. संध्या)



श्रीलंकेत शांती सेनेत कार्यरत असताना वीरगती प्राप्त झालेले शहीद रमेश शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना पिंगोरी (ता.पुरंदर) येथील शहीद स्मारकावर माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुरंदर तालुक्यातील पिंगोरी हे गाव 'सैनिकांचे गाव' म्हणून ओळखले जाते. याच गावातील रमेश शिंदे हे श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठवण्यात आलेल्या भारतीय शांती सेनेत सहभागी झाले होते.परंतु तमिळ बंडखोरांनी घातपाने केलेल्या हल्ल्यात २४ मार्च १९८९ रोजी त्यांना व त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनाही प्राणांची आहुती द्यावी लागली होती.

शहीद रमेश शिंदे यांच्या स्मरणार्थ पिंगोरी गावात शहीद स्मारक उभारण्यात आले असून, दरवर्षी २४ मार्च हा दिवस 'शहीद दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्रामस्थ एकत्र येत स्मारकासमोर पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना अभिवादन करतात. यंदाही हा दिवस मोठ्या श्रद्धेने पाळण्यात आला. या कार्यक्रमाला पोलीस पाटील राहुल शिंदे, सरपंच संदीप यादव, माजी सरपंच व विद्यमान सदस्य जीवन शिंदे, शहीद रमेश शिंदे यांचे सुपुत्र व ग्रामपंचायत सदस्य प्रकाश शिंदे, तसेच माजी सैनिक राजेंद्र शिंदे, बबन शिंदे, महादेव गायकवाड, अरुण शिंदे, गौतम कांबळे, वसंत शिंदे, राजकुमार शिंदे, सुनील शिंदे, शंकर शिंदे, प्रवीण शिंदे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहीद रमेश शिंदे यांच्या कुटुंबीयांनीही देशसेवेची परंपरा पुढे चालू ठेवली आहे. त्यांच्या तीन मुलांपैकी थोरला मुलगा भारतीय सैन्यात कार्यरत असून देशसेवा बजावत आहे. दुसरा मुलगा महाराष्ट्र पोलीस दलात सेवा देत आहे, तर तिसरे पुत्र प्रकाश शिंदे यांनी ग्रामपंचायतीत उपसरपंच म्हणून गावसेवा केली आहे.

यावेळी प्रकाश शिंदे म्हणाले, "वडिलांचे निधन हे दुःखद आहे, पण त्यांनी देशासाठी बलिदान दिले, याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांच्या जाण्यानंतर आईने आमच्या मनात देशप्रेमाची ज्योत कायम पेटती ठेवली."

# नवोदय परीक्षेत जिल्हा परिषद पुणेचा दबदबा; गुणवत्तेची ठोस छाप

नाझरे सुपे (दै. संध्या)




पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जिल्हा परिषद पुणेच्या शाळांनी यंदा पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित केली आहे. सीबीएसईमार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कठीण स्पर्धेत जिल्हा परिषद पुणेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी यश संपादन करत विशेष ठसा उमटवला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता सहावीपासून बारावीपर्यंत निवासी स्वरूपात, सीबीएसई अभ्यासक्रमानुसार मोफत शिक्षण दिले जाणार आहे.

जिल्हा परिषद शाळांचा तालुकानिहाय निकाल पुढीलप्रमाणे : आंबेगाव (१३), बारामती (१), भोर (२), दौंड (१), हवेली (१), इंदापूर (९), जुन्नर (१), खेड (२१), मावळ (१), मुळशी (२), शिरूर (१०)

खाजगी शाळांचा निकाल : पुरंदर (१), जुन्नर (२), मावळ (१), बारामती (२) खेड (२१) आणि आंबेगाव (१३) तालुक्यांनी आघाडी घेतली असून इंदापूर (९) आणि शिरूर (१०) येथील विद्यार्थ्यांनीही लक्षणीय कामगिरी केली आहे. इतर तालुक्यांमधूनही विद्यार्थ्यांनी पात्र ठरत जिल्ह्याच्या एकूण निकालात भर घातली आहे. जिल्हा परिषद पुणेच्या शिक्षण विभागाने राबविलेल्या विशेष मार्गदर्शन, सराव परीक्षा आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्यांची तयारी अधिक भक्कम झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मर्यादित साधनसामग्रीतूनही स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवून आपली क्षमता सिद्ध केली आहे.

वीरधवल जगदाळे (अध्यक्ष, जिल्हा परिषद पुणे) म्हणाले, "नवोदय परीक्षेतील हा निकाल जिल्हा परिषद पुणे शाळांच्या गुणवत्तेचा ठोस पुरावा आहे." विवेक वळसे पाटील (उपाध्यक्ष व सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद पुणे) यांनी सांगितले, "विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा सहभाग यामुळे हे यश शक्य झाले आहे." गजानन पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे) यांनी समाधान व्यक्त करत पुढील काळात गुणवत्तावाढीसाठी अधिक प्रयत्न केले जातील, असे नमूद केले.